औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १९.०१.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

बुधवार दिनांक १९.०१.२००५ रोजी मा.महापौर सौ.रूख्मीणी राधाकिसन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील '' प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह '' येथे दुपारी १.०५ वाजता '' वंदेमातरम् '' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले
०३. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.वाणी ठकूजी रामसिंग
०६. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०७. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०८. स.स.श्री.शे.ईलियास किरमाणी शे.उमर
०९. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
१०. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
११. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
१२. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१४. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१५. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१६. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१९. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
२०. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२२. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२३. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२४. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२५. स.स.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
२६. स.स.श्री.नजर हमीद अ.गफ़ुर
२७. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२८. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
२९. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
३०. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड

३१. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३२. स.स.सौ.रशिदा बेगम गफ़्फ़ार यारखान
३३. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
३४. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
३५. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
३६. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३७. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३८. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
३९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
४०. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
४१. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब
४२. स.स.सौ.नुसरत बानो फ़िरोजखान
४३. स.स.श्री.तायडे पांडूरंग यशवंतराव
४४. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४५. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४६. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४७. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४८. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४९. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
५०. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
५१. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५२. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५३. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५४. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५५. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५६. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५७. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५८. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५९. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
६०. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
६१. स.स.श्री.अजिजखान गणीखान
६२. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६३. श्री.शे.मुनाफ़ शे.यासीन
६४. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
६५. स.स.श्री.कै सर खान बद्रोद्दीन खान
६६. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
६७. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६८. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
६९. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
७०. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
७१. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

(नामनिर्देशित पालिका सदस्य)

०१. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे

०२. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर

०३. सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

संवाद :

श्री.स.अली सलामी : या शहराचे माजी विधान परीषद सदस्य स्व.शालिग्राम बसैय्ये (बंधु) यांचे दु:खद निधन झाले. ते सामाजिक कार्यकर्ते होते व या सभागृहाचे सदस्यही होते. त्यांनी या शहरासाठी विकास घडवून आणलेला आहे. या शहरासाठी त्यांचे कार्य महान ठरलेले आहे.त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.भागवत कराड : या सभागृहाचे सदस्य राहीलेले भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ कार्यकर्ते व विधान परीषदेचे सदस्य म्हणून काम केलेले जे बंधु या नावाने ओळखले जात होते, त्यांचे आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांनी त्यांच्या आमदार निधीतून या महानगरपालिकेस २५ सांस्कृतिक हॉल बांधणेसाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे.त्यांची आठवण म्हणून त्यांचे स्मारक उभारण्यात यावे.

श्री.नंदकुमार घोडेले : माजी महापौर श्री.सुदाम सोनवणे यांचे चिरंजीव कृष्णा सोनवणे यांचे अत्यल्प वयात दु:खद निधन झाले, त्यांना सुध्दा या सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.रतनकुमार पंडागळे : माजी आमदार स्व.बसैय्ये बंधु हे या सभागृहाचे १९७८ ला सदस्य होते. नगरपालिका सभागृहात एकत्र काम करतांना त्यांच्यात नम्रता, मन मिळावूपणा, सर्वांना घेवून चालणारे अशा व्यक्तीमत्वाचे होते. मी माझ्या वतीने व माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दाजंली अर्पण करीत आहे.

श्री.मिर हिदायत अली : वरील दोघानांही सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

मा.महापौर : श्रध्दाजंली साठी कृपया सर्वांनी उभे रहावे.

(यावेळी दिवंगतांना ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून सभागृहात श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री.भागवत कराड : या शहरात बालरोग तज्ञांची दि.६ ते ८ जानेवारी २००५ ला प्रथमच राष्ट्रीय परीषद झाली. या परीषदेला देश विदेशातील तज्ञ डॉक्टरांनी सहभाग घेतला. या परीषदेसाठी संयोजक डॉ.अशोक बगाडीया व डॉ.श्री.कानन येळीकर यांनी खूप परीश्रम घेतले. सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यांत यावे.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वार्डात पिण्याच्या पाण्यामध्ये ड्रेनेजचे घाण पाणी येत असून माझा अर्धा वार्ड बिमार पडलेला आहे. पिण्याच्या पाण्याला वास येत आहे. हे असे किती दिवस येणार आहे. कामे करण्यास कळविले असता अनाधिकृत वसाहतीत काम करता येत नाही असे सांगितले जाते. परंतू काही अनाधिकृत वस्त्यामध्ये लोकप्रतिनिधी यांचे निधीतून विकास कामे होत आहे. माझ्याच वार्डात का होत नाही. हे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. तात्काळ काम करण्याच्या सूचना देण्यांत याव्या.आताच स.सदस्य डॉ.कराड यांनी डॉ.बगाडीया व डॉ.येळीकर यांचे राष्ट्रीय पातळीवर बाल रोग तज्ञांची परीषद आयोजित केल्या बद्दल अभिनंदन करणेच्या सूचना केली. या परीषदेसाठी मा.महापौर यांना निमंत्रित करण्यांत आलेले होते का, त्यांचे पत्रिकेवर नांव होते का, असे असेल तर अभिनंदन करणेस हरकत नाही.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : स.सदस्य डॉ.कराड यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, डॉक्टरांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.सुनिल मगरे : स.सदस्य डॉ.भागवत कराड यांनी सूचविल्याप्रमाणे अ

मा.महापौर : डॉक्टरांचे अभिनंदन करण्यांत येते.

श्री.संजय शिरसाट : गेल्या दोन तीन सभेच्या बातम्या वेगवेगळ्या पध्दतीने वृत्तपत्रात आलेल्या आहेत. ही सभा शेवटची आहे म्हणतात सर्वांना बोलण्याची संधी मिळेल अशी चर्चा करावी. विकासात्मक बाबीवर चर्चा होण्यासाठी वेळ देण्यात यावा. प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घ्यावे. गोंधळात सभा संपन्न होते, असे चित्र दिसायला नको. जाता जाता सभागृहाची शान राखू. एकेक करून सर्वांना बोलण्याची संधी द्यावी.

श्री.मिर हिदायत अली : प्रत्येक वेळेस सभागृहात गोंधळ होतो, विषय मंजुर करण्यात येतात, राष्ट्रगित होवून सभा संपविण्यात येते, असे होवू नये, सर्वांनी चर्चा करावी. अधिनियमाचे कलम ६७ (३)(क) प्रमाणे फुटपाथचे काम करण्यात आलेले आहे. ते काम तातडीचे होते का, खूलासा व्हावा. तसेच त्या कामाचे टेंडर नोटीस काढून का रद्द करण्यात आली, याचाही खूलासा व्हावा.

मा.महापौर : अति.शहर अभियंता यांनी खूलासा करावा.

अति.शहर अभियंता : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) प्रमाणे मा.आयुक्तांना काम करण्याचे अधिकार आहे. कोणती कामे करावी नियमात नमूद केलेली आहे. नैसर्गिक आपत्ती व ऐनवेळी आयुक्तांना महत्वाची व करावी वाटते ती कामे करता येतात.

श्री.मिर हिदायत अली : फुटपाथचे काम महत्वाचे नव्हते, कलम ६७ (३)(क) अंतर्गत करणे आवश्यक नव्हते. निविदा सूचना काढण्यात आल्या होत्या. जो खूलासा करण्यात आला, तो बरोबर नाही. पूर्णत: दिशाभूल केलेली आहे. तातडीचे काम नाही. हे काम करता येणार नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे तरतूदी प्रमाणे व्हावे.

श्री.संजय शिरसाट : संबंधित अधिकारी यांनी खूलासा केलेला आहे.

श्री.गाजी सादोद्दीन : कलम ६७ (३)(क) अंतर्गत काम करावयाचे होते तर निविदा सूचना का लावली, निविदा न काढता काम करता येवू शकते. पून्हा निविदा रद्द का करण्यात आली. सदर प्रकरणांत काहीतरी किंतू परंतू दिसते.

मा.महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी लेखी स्वरूपात खूलासा करावा. ज्या नगरसेवकांना आपआपल्या वार्डात तातडीने काम करून घ्यावयाचे असेल, त्यांनी पाठपूरावा करून काम करून घेतले असेल. आचार संहिता लागणार काम होईल का, असे सर्वांना वाटत असेल सदस्यांचा मुद्दा असा आहे की, हे काम कलम ६७ (३)(क) मध्ये येते किंवा नाही.

मा.आयुक्त : कलम ६७ (३)(क) चे अधिकार संपूर्ण पणे व सक्षमपणे आयुक्तांनी वापरावे अशी तरतूद आहे,ते वापरले. युज आहे मिसयुज आहे ते ठरवावे.

श्री.स.अली सलामी : प्रश्न वेगळा होतो, खरोखरच इतक काम आवश्यक होते व कलम ६७ (३)(क) अंतर्गत काम करण्याची आवश्यकता होती, तर त्याची निविदा सूचना का काढली. नंतर निविदा रद्द केली. अशी कार्यवाही करण्याची आवश्यकता का पडली.

विषय क्र. ५२३ :

औरंगाबाद महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त यांनी आयुक्त पदाचा पदभार स्विकारल्यापासून शहरातील विविध प्रकारच्या विकास कामांना गती आलेली आहे. हा जरी प्रशासनाचा भाग असला तरी मा.आयुक्तांच्या कार्यकुशलतेमूळे उत्पन्नात भरीव वाढ झालेली आहे. सर्व सक्षम अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करून प्रशासन गतीमान केले. म्हणून मा.श्री.आर.अेन्. जोशी हे अभिनंदनास पात्र आहेत. यावर्षीच्या अर्थसंकल्पातील ९८% विकास कामे मार्गी लागलेली असून उर्वरीत २% कामे मंजूरीस्तव अंतिम टप्प्यात

आहेत. या महानगरपालिकेच्या इतिहासात लक्षात राहण्याजोगे काम करणारे उमटविणारे जे तीन-चार आयुक्त आले त्यात मा.श्री.आर.अेन्. जोशी यांचे नांव घ्यावे लागेल.

म्हणून सर्व सभागृहाने एकमुखाने मा.आयुक्त श्री.आर.अेन्.जोशी यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.रतनकुमार पंडागळे, श्री.काशिनाथ कोकाटे, श्री.तकीहसन खान, श्री.स.अली सलामी

अनुमोदक : श्री.संजय शिरसाट, श्री.सुनिल मगरे, श्री.मिर हिदायत अली, श्री.आनंद तांदुळवाडीकर

संवाद :

श्री.रतनकुमार पंडागळे : मा.आयुक्तांनी पदभार स्विकारल्यापासून विकास कामांना गती आली आहे. हा प्रशासनाचा भाग आहे. तसेच उत्पन्नात सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. जकात वसूली असेल, मालमत्ता कराची वसूली असो किंवा नगर रचना विभागाची वसूली असेल मा.आयुक्तांनी सर्व अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करून प्रशासन गतीमान केले. त्याबद्दल मी मा.आयुक्तांचे अभिनंदन करण्याचा ठराव मांडत आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : स्थायी समितीचे माजी सभापती स.सदस्य श्री.पंडागळे यांनी चांगले मत व्यक्त केले आहे. अर्थ संकल्पातील ९८% कामे मार्गी लागलेली आहे. फक्त २% कामे बाकी असून ती ही अंतीम टप्प्याच्या मंजूरीसाठी आहे. माझे विभागातील १००% कामे झाली आहेत. जी कामे होती ती झाली आहे. हाच मुद्दा स्थायी समिती समोर उपस्थित झाला तेंव्हा अधिकाऱ्यांनी कामाचा अहवालच समोर ठेवला होता खरोखर प्रशासनाचे अभिनंदन करावे. हे प्रशासन गतीशील प्रशासन आहे. निश्चितपणे वार्डात जास्तीत जास्त प्रभावीपणे कामे करण्याचा प्रयत्न मा.आयुक्त यांनी केलेला आहे. कामे होऊन कोणी बदनाम करण्याचा विरोधाभास करित असेल तर ते योग्य नाही. या आजच्या सभेत शांतता पूर्वक चर्चा व्हावी, विकास कामावर चर्चा व्हावी. किमान १-२ तास चर्चा होवू शकेल. योग्य निर्णय घेता येईल, अशी विनंती आहे.

श्री.सुनिल मगरे : स.सदस्य श्री.पंडागळे यांनी मा.आयुक्तांचे अभिनंदनाचा ठराव मांडला, माझे मत असे की, महापालिका अस्तित्वात आल्यापासून तत्कालीन आयुक्त श्री.सतिष त्रिपाठी त्यांच्या कामाचा वेगळा ठसा, त्यानंतर श्री.भोगे साहेब त्यांचा वेगळा ठसा व आता सध्याचे आयुक्त श्री.जोशी साहेब यांनी महापालिकेच्या विकास कामाच्या बाबतीत ठसा उमटविलेला आहे. या पालिकेत आयुक्त पदावर येण्यास कोणीही तयार नव्हते, अनेक बदलून गेले, ही वस्तुस्थिती आहे. मी आत्मविश्वासाने सांगू इच्छितो की, श्री.आर.एन.जोशी, आयुक्त यांनी गतीमान प्रशासन दाखवून दिले. मागील वर्षाची राहीलेली जी कामे समाविष्ट होती ती सूध्दा झालेली आहे. अर्थ संकल्पातील ९८% कामे झालेली असून २% कामे बाकी आहे. ती कामे कार्यादेश देण्याच्या स्तरावर आहेत. श्री.पंडागळे यांनी मा.आयुक्त यांचे अभिनंदन करण्याचे प्रस्तावित केले त्यास माझे पूर्ण अनुमोदन आहे.

श्री.संजय शिरसाट : मा.आयुक्तांनी चांगले काम केले. त्यांचे अभिनंदन ठरावास कोणाचाच विरोध नसावा असे माझे मत आहे. सर्व नगरसेवकांनी चांगले काम करतात म्हणून एक मुखाने अभिनंदन केले. ते शासनास कळवावे व पूढील ३ वर्षापर्यंत त्यांची येथून बदली करू नये, असेही कळवावे.

श्री.मिर हिदायत अली : अभिनंदन करण्यास हरकत नाही.

श्री.तकीहसन खान : मा.आयुक्त यांनी चांगले काम केले, अभिनंदन करण्यास माझा पाठिंबा आहे. सर्वांची यास सम्मती आहे. परंतू एकीकडे अभिनंदन व शासनास अधिकारी भ्रष्ट आहे, असे पत्र दिलेले आहे.

श्री.स.अली सलामी : गेल्या ४-५ वर्षात १४ आयुक्त येथे बदली होऊन येऊन गेले. सध्याचे आयुक्त श्री.जोशी साहेब यांनी १ ते दिड वर्षात चांगली व जास्तीत जास्त व खऱ्या अर्थाने विकास कामाला गती दिली. ते अभिनंदनास पात्र आहे. सक्षमपणे काम करीत आहे. त्यांचे विरोधी पक्षा तर्फे ही अभिनंदन करण्यात येते. आमचे सर्वांचे अनुमोदन आहे. सभागृह अभिनंदन करते व आपल्याच पक्षाच्या महापौर एकीकडे अधिकाऱ्या विषयी शासनास पत्र देतात, आपल्या पक्षाच्या लोकांना सांगून एल.ए.क्यु. करतात, हे बरोबर नाही. महापौरांचे पत्र गेले ते खोटे आहे, हे सत्ताधारी यांनी दाखवून दिले.

श्री.तकीहसन खान : अभिनंदन केल्याबद्दल शासनास ताबडतोब कळवावे.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : मी सहमत आहे. विकास कामे करतांना दिड, दोन वर्षापासून विकास गाडा चालत आहे. १००% वार्डात विकास कामे झालेली आहे. सर्वांची सम्मती आहे, मा.आयुक्तांचे अभिनंदन.

मा.महापौर : मा.आयुक्त यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यांत येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त यांनी आयुक्त पदाचा पदभार स्विकारल्यापासून शहरातील विविध प्रकारच्या विकास कामांना गती आणली, मा.आयुक्तांच्या कार्यकुशलतेमूळे उत्पन्नात भरीव वाढ झालेली असून व प्रशासन गतीमान करून तसेच यावर्षीच्या अर्थसंकल्पातील ९८% विकास कामे मार्गी लावलेली असून व उर्वरीत २% कामे मंजूरीस्तव अंतिम टप्प्यात असल्यामूळे या महानगरपालिकेच्या इतिहासात लक्षात राहण्याजोगे काम करणारे व स्वत:चा वेगळा ठसा उमटविणारे मा.आयुक्त श्री.आर.अेन्. जोशी यांचे सर्व सभागृहा तर्फे अभिनंदन करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

संवाद :

सौ.लिलावती घायतिलक : मी मागच्या सभेत प्रश्न विचारले त्याचे समर्पक उत्तर मिळाले नाही. दैनिक वेतना बाबत प्रशासनाला दोन वर्षात चार पत्र दिले, त्याचा खूलासा होत नाही. मला अपेक्षित उत्तर मिळत नाही. मा.आयुक्तांनी विशेष लक्ष घालून त्यांच्या पाल्यांना नौकरी मिळवून द्यावी. माझ्या वार्डात अनेक कामे अर्धवट असून विद्युत, डांबरीकरण कामास मान्यता मिळून देखील कामे सुरू झाली नाही. माझ्या वार्डाती ६ मंजूर कामे काढून घेतले. वार्डात व्हावी तशी स्वच्छता नाही. चार वर्ष संपत आले.

मा.महापौर : मा.आयुक्त यांनी खूलासा करावा.

मा.आयुक्त : स.सदस्य यांनी पत्र दिले ही बाब बरोबर असून काल मी प्रधान सचिव यांचेशी चर्चा केली, जे २२ लोक व २-३ इतर कर्मचारी त्यात आपले व रविंद्र देशमुख कर्मचारी येतात, यांचे बाबत लवकर निर्णय घ्यावा म्हणून सांगितलेले आहे. तसेच एक मोठा प्रस्ताव पाठवला त्यात २६८ कर्मचारी आहेत. त्याबाबत शासनाचे दोन-तीन मुद्दे आहेत, जे की, ते वारंवार चर्चा करतात, शासनाचे काल-परवा पत्र आलेले आहे. शासनाचे असे म्हणणे आहे की, अस्थापनेवरील खर्च हा मर्यादीत ठेवण्यासाठी महापालिकेने जी बंधने पाळायची ती पाळलेली नाहीत. म्हणून शासनाने असे दिले की, महापालिकेस आवश्यक असा कर्मचारी किती पाहीजे तसे

विभाग निहाय यादी द्यावी. व कामे करता येतील का याचा विचार करावा असे म्हटले आहे. ५००, ७००, [illegible]शी पदे निर्माण करणे शक्य नाही. व ते महापालिकेच्या हिताचे होणार [illegible] या सभागृहात मा.महापौर यांचे परवानगीने सांगू इच्छितो की, येणाऱ्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत विषय मांडणार आहोत विशेषत: पाणी पूरवठ्याचे कर्ज ३८६ कोटीचा आहे तसे सर्व मार्गी लावण्याचे काम २-३ कामे सचिव पातळीवरून झालेले आहे. त्यानूसार पूढील महिन्यात निश्चितपणे कर्मचारी संख्या वाढवण्या बाबत मंजूरी मिळेल. जेणे करून कर्मचारी भरण्यास सध्या अडचण येते. याबाबत सविस्तर खूलासा आयुक्त म्हणून नंतर दिला जाईल. कारण आताच बोलणे बरोबर होणार नाही. स.सदस्या श्रीमती घायतिलक यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या बाबत सहाय्यक आयुक्त-१ श्री.जाधव हे या कामासाठी व आणखी दोन तीन कर्मचाऱ्यांच्या कामासाठी त्यांना स्वंतत्ररित्या मुंबईला पाठविण्यात येईल. ते मुंबईला थांबतील व काम करून घेण्याचा प्रयत्न करतील.

श्री.भागवत कराड : अतिक्रमण काढणे,स्वच्छता ईत्यादी कामे त्यांच्या वार्डात होत नाही. डांबरीकरण होत नाही व विद्युत खांबे स्थलांतर होत नाही या बाबत खूलासा व्हावा.

प्रशासकीय अधिकारी : संजयनगर,मुंकूंदवाडी अतिक्रमाणाबाबत खूलासा करण्यात येतो की, ७ तारखेला प्राप्त झालेले निवेदना प्रमाणे शाखा अभियंता इमारत विभाग यांच्या सोबत जावून अनाधिकृत पाडण्यात आले.झोपडपट्टी भाग आहे.तरी देखील मोकळ्या जागेवरील अतिक्रमण पाडले, व अहवाल सादर करण्यांत आलेला आहे.

श्री.भगवान रगडे : महानगरपालिकेच्या वतीने कुंपन भिंत पाडण्यात आली. अगोदर बांधायला लावणे व नंतर तोडणे हे बरोबर नाही.

प्रशासकीय अधिकारी : शहर अभियंता यांनी पत्र दिले आहे. बांधकाम नेमूण दिलेल्या जागी होत नाही. शाखाअभियंता यांच्या समक्ष तोडण्यांत आले.शाखा अभियंता तेथे उपस्थित नव्हते, पत्र न पाहता अतिक्रमण म्हणून काढण्यात आले, मी स्वत: पाहीले त्यांनी एक फुट पाठीमागे काम केले, का पाडण्यात आले.

श्री.भागवत कराड : स.सदस्या श्रीमती घायतिलक यांच्या प्रभागातील अतिक्रमण काढले, परंतू विद्युत खांबे स्थंलातरीत करण्या बाबत एम.एस.ई.बी.ला कळविण्यांत यावे.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वार्डात मागील एक महिन्यापासून घाण पाणी येत आहे. ड्रेनेज चोकअप झालेले आहे. गुंठेवारी अंतर्गत काम करता येत नाही, असे सांगण्यात येते. देखभाल दुरूस्तीचे काम करण्याचे पत्र आलेले आहे का. आलेले असेल तर कर्मचाऱ्यांना आदेश द्यावे. मा.महापौर,मा.आयुक्त यांनी सुध्दा वार्डात भेट द्यावी.माझ्या वार्डातील अर्धे लोक आजारी आहेत. दोन चार लोकांना गॅस्ट्रो झालेला आहे. गुंठेवारी अंतर्गत काम होत नाही, असे सांगतात. तर लगतच्या वार्डात आमदार निधीतून कामे होतात. जनेतेत रोष निर्माण होतो. मी शासनाचा निषेध करते.

कार्यकारी अभियंता (ड्रे.): संजयनगर,मुकूंदवाडी भागातील विद्युत पोल स्थलांतर करणे बाबत रू.५६ हजार एम.एस.ई.बी.ला भरणा केलेले आहे. एम.एस.ई.बी.कार्यालयात जावून काय अडचण आहे, त्याबाबत तपासणी करण्यांत येईल. गुंठेवारी अंतर्गत नियमित करता येऊ शकत असेल तर देखभाल दुरूस्तीची कामे करता येतात. व या भागात झोन कार्यालया कडून मजूर व जेटींग मशीन द्वारे अनेकवेळा दुरूस्तीची कामे केलेली आहे.लोक संख्येचे प्रमाण जास्त झालेले असल्याने हा प्रकार वारंवार होत आहे. बऱ्याच वेळा चोकअप काढण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्री.भागवत कराड : गुंठेवारी अंतर्गत काम करता येत नाही, म्हणून त्यांनी शासनाचा निषेध केलेला आहे. ड्रेनेज लाईनचे पाईप बदलण्याचे आदेश द्यावेत. त्या भागात आमदार निधी अंतर्गत डांबरीकरण काम झाले महानगरपालिकेमार्फत ड्रेनेजचे काम झाले तर त्याबद्दल तक्रार येणार नाही.

श्री.मिर हिदायत अली : जनतेला घाण पाणी द्यावे,असे [illegible]वे आदेश नाही. [illegible] जबाबदारी महानगरपालिकेची आहे. महानगरपालिकेने स्वच्छतेकडे लक्ष द्यावे. गुंठेवारी संदर्भात शासन आदेश आहे की, तुम्हाला जे दर परवडते त्या दराप्रमाणे आकारणी करावी. शासनाने रूपये १२० प्रती चौरस मीटर ठरवून दिले. आपणांस जे परवडते ते आपण मंजूर करावे. ५० रूपये प्रती चौरस मीटर करावे, ते शासनास पाठवावे. यापूर्वी आपण कमी दर मंजूर केले, ते का पाठविले नाही.

श्री.भागवत कराड : आपले प्रशासन काम का करत नाही. गुंठेवारी संदर्भात शासनाने जी.आर.काढला म्हणून निषेध करण्यात आलेला आहे. येणाऱ्या मंत्रीमंडळाच्या बैठकीच्या वेळेस गुंठेवारी रद्द करण्या संदर्भात विरोधी पक्षनेता,महापौर इतर पदाधिकारी व सदस्यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे जावे. व गुंठेवारी रद्द करून घ्यावा.

श्री.जयवंत ओक : या शहरात २१० अनाधिकृत वसाहती आहे. स.सदस्या श्रीमती मानकापे ताई यांच्या वार्डात जनता मागील २५ ते ३० वर्षापासून राहते, मालमत्ता कर भरते,पाणी पट्टी भरते, यापूर्वी सुविधा देण्यांत आलेल्या आहे. ड्रेनेज वाहत आहे, ते दुरूस्ती करण्यासाठी सांगण्यात येते, नविन कामे मागत नाही. नगर परीषदेचे जूने भागातील जेथे गुंठेवारी येते, तेथे रोड,लाईट,पाणी ची कामे केलेली आहे. गुंठेवारी कायदा आघाडी सरकारने आणला,त्यात दुरूस्ती करायची नाही असे आहे का. जनतेला कायदा माहित नाही. गुंठेवारी कायद्या बाबत फार वाद निर्माण होतो, हे आपल्याला लागू होत नाही. आपल्या महापालिकेत २०×३० फुट आकाराचे भुखंड आहेत गुंठेवारी ही पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर सांगली यांना लागू पडतो. आपले शहर औकाफ, व २०×३० फुट क्षेत्राच्या भूखंडावर बसलेले आहे. निम्यापेक्षा जास्त भाग अनाधिकृत वसाहतीचा येतो, नगरसेवक अनाधिकृत आहेत का. ड्रेनेज वाहते. आपल्याला करता येते का, पाणी, ड्रेनेज,लाईट ई.कर्तव्ये आहेत ते देता येतात. देता येत नसेल तर टॅक्स घेवू नका. भावना लक्षात घ्या नविन माघत नाही. ड्रेनेज काम रस्ता दुरूस्ती व्हावी. ना हरकत प्रमाणपत्र कसे देता येईल ते काम पहावे.नसता त्या भागात महापालिका झोपलेली आहे, असे बोर्ड लागतील त्यात आपण सर्व पदाधिकारी येतो, आपण खूलासा करायला लावा, ज्यामूळे त्रास होणार नाही. गुंठेवारी कोणी लागू केली,मतदारांना गुंठेवारी माहित नाही. मतदारांच्या भावनेशी खेळू नका, हा प्रश्न एकट्या मानकापे ताईचा नसून तेवढा नागरीकांचा,जनतेचा आहे. सर्व भागात अप्रुटींग, देखभाल दुरूस्ती झाली पाहीजे.

श्री.स.अली सलामी : स.सदस्य यांनी अनाधिकृत वसाहतीत राहतात त्यांना सूविधा देण्याबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. शासनाचा निषेध करून काही साध्य होणार नाही. शासनाने आदेश दिले ते जनतेसाठी दिले,गुंठेवारी नूसार घरांना पी.आर.कार्ड मिळाल्यानंतर ते अधिकृत होतील. मालकीचे कागदपत्र तयार होतील. गुंठेवारी कायदा समजण्यात काहीतरी चूक होत आहे. शासनाने रू.१२०/- निश्चित केले आहे. आपण काय दर ठरवायचा ते ठरवावे शासनाने तीन वेळा मुदत वाढ दिली. आपण पून्हा एक वेळ मुदतवाढ मागवून घ्यावी. कोणी कोणाचा निषेध करून जनतेचे काम होणार नाही. जनतेचे काम व्हावे,हा दृष्टीकोन समोर असावा.

श्री.जयवंत ओक : हे शहर गुंठेवारी मध्ये येत नाही,हे शहर २०×३० च्या बॉन्डवर प्लॉट घेवून बांधकाम केलेले आहे, त्यामूळे निषेध केलेला आहे.

श्री.स.अली सलामी : गुंठेवारी बाबत शासन निर्णय होवून ३ वर्षे झाली आपणांस मान्य नसेल तर मा.उच्च न्यायालयात आव्हान करायचे असते.

श्री.भगवान घडमोडे : शहराचा बराच भाग २०×३० प्रमाणे विकसीत झालेला आहे.निषेध करायचे की नाही ही बाब वेगळी आहे. गुंठेवा[illegible]दा पुण्याची मंड[illegible] आहे, या शहराची भौगोलिक परिस्थिती पाहता,लागू करता येणार नाही. ९ मीटर रस्ते, १० मी.खुली जागा बॉन्ड वरील व्यवहार विकास खर्चाची आकारणी यावर चर्चा झाली.जी वसूली होणार आहे. त्याच रक्कमेतून वार्डात विकास कामे करण्यात येतील व त्यातून १०% रक्कम महापालिकेकडे अनामत ठेवावी लागेल,किचकट कायदा आहे, विकास खुंटलेला आहे. आज वार्डात ड्रेनेज दुरूस्त करता येत नाही. आमदार श्री.दर्डा साहेबांच्या निधीतून काम करता येते, नगरसेवकाच्या निधीतून काम नाही. माजी आमदार श्री.बागडे साहेब यांच्या निधीतून १० हजाराचे काम करायचे होते, त्यांनी त्या संदर्भात मला पत्र दिले, गुंठेवारी अंतर्गत ते काम करता येत नाही. गरीब लोकांची कामे नगरसेवक निधीतून होत नाही. त्यामूळे शासनाचा निषेध झाला पाहीजे.

श्री.स.अली सलामी : स.सदस्यांना गुंठेवारी कायदा समजलेला दिसत नाही. शासनाने १२०/- रू.दर निश्चित केले, या महापालिकेत किती रक्कम निश्चित करायची तो ठराव घ्यावा, व ते लागू करावे. वसाहती प्रमाणे गुंठेवारी लागू करावी. आपल्या महानगरपालिकेस लागू करायची नव्हती तर का काम सुरू केले, आपलं भलं होईल,म्हणूनच सुरूवात केलेली आहे.

श्री.भागवत कराड : गुंठेवारी कायद्यातंर्गत अनाधिकृत वसाहतीत दुरूस्तीची कामे होत नाही. स.सदस्या श्रीमती मानकापे ताई यांच्या प्रभागात दुषित पाणी आले, ते त्यांनी आणून दाखविले निषेध करा अथवा करू नका,नविन कामे करू नका पण देखभाल दुरूस्तीची कामे करावी.

(यावेळी स.सदस्या मोठमोठ्याने महापौर डायस समोर बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री.मिर हिदायत अली : शासनाने जी.आर.काढला प्रशासनाला योग्य प्रकारे कार्यवाही करता आली नाही.

श्री.नासेरखान कुरैशी : शासनाने गुंठेवारीचा कायदा लागू केला एक गुंठा म्हणजे १००० चौ.फु. अनाधिकृत भुखंड,२०×३० चे ६०० चौ.फु. शहरात अर्ध्या पेक्षा जास्त अनाधिकृत बरेच लोक २०० चौ.फु .मध्ये राहतात. गुंठेवारी हा कायदा १००० चौ.फु.साठी लागू होतो. कोणास गुंठेवारी म्हणावे, हा प्रश्न आहे.

(यावेळी सभागृहात घोषणा देण्यांत येतात.)

श्री.तकीहसन खान : गुंठेवारी कायदाच कोणाला समजला नाही, गुंठेवारी काय आहे ते समजून घ्यावे, ही प्रत्येक नगरसेवकांची जबाबदारी आहे. गरीब जनतेचा छळ होवू नये.

मा.आयुक्त : बराच वेळ या विषयावर चर्चा झालेली आहे. आयुक्त म्हणून शासनाचा निषेध हा माझा विषय होत नाही.परंतु गुंठेवारी पध्दतीत प्रशासनाच्या वतीने व सभागृहाच्या मार्गदर्शनाने काय करता येईल, व केलेले आहे. या सभागृहात जे जे मुद्दे आताच चर्चेला आले,त्याचे उत्तर त्यात निश्चित आहे. दोन सभा गुंठेवारीवर झाल्या होत्या. प्रशासनाने त्यावर टिप्पणी दिलेली होती. त्यावर शासन पातळीवर चर्चा झाली. त्यावेळी महापालिकेचे पदाधिकारी होते. प्रधान सचिव श्रीयुत लाला साहेब असतांना चर्चा झालेली होती. त्या चर्चेअंती एक लहान फायदा असा झाला की,

शासनाच्या नगर विकास विभागाकडून एक पत्र ०८ जानेवारी २००४ रोजी आले, जे की,आताच आपण चर्चा केली त्यात असे म्हटले की,अगोदर केलेली कामे ती नादुरूस्त असेल तर व जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. राहणी मानावर अनिष्ट परीणाम होऊ शकतो. त्या ठिकाणी तातडीची कामे करण्यास हरकत नाही. त्याप्रमाणे प्रशासनाचे जेव्हढे अधिकारी येथे उपस्थित आहेत त्यांना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. आताच चर्चा झाली बॉन्ड वरील व्यवहार १०× ओपन स्पेस, शाळेचे आरक्षण आहे, उद्यानाचे आरक्षण आहे किंवा स.सदस्यांनी विचारणा केली. ६०० चौ.फुट वर जाऊ नये. १००० चौ.फुटाच्या खालील जागेची कार्यवाही करणार का? या संदर्भात यापूर्वी बरीच चर्चा झालेली ही होती. त्यानूसार शासनास ठळक मुद्दे पाठविण्यात आलेले आहे. स्थायी समितीच्या बैठकीत ही या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. शासनास २ जूलै २००४ रोजी सविस्तर पत्रही प्रशासनाने दिलेले होते. त्यानंतर नगर विकास विभागाचे उप सचिव येथे आलेले होते.त्यांचेकडे ही स.पदाधिकारी,नगरसेवक यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे. एवढे झाल्यानंतर पून्हा शासनाकडे पाठपूरावा करण्यात आला. प्रशासन व सर्व पक्षाचे सदस्य यांनी पाठपूरावा केल्यानंतर १४ सप्टेबंर २००४ रोजी शासनाने काही मुद्द्याच्या बाबतीत खूलासा प्राप्त आहे. सप्टेबंर २००४ च्या नंतर एक नविन मुद्दा समोर आलेला आहे. जो की, आपण नेहमीच हा मुद्दा मांडीत होते की, २०×३० च्या प्लॉटची रजिष्ट्री असल्याशिवाय व कागदपत्र असल्याशिवाय पूढील कार्यवाही होवू नये. अशी अडचण पूढे आल्यानंतर देखभाल दुरूस्तीची कामे करण्यास अडचण निर्माण झालेली आहे. परत एकदा सांगतो की, जी कामे पूर्ण झालेली आहेत, त्याबाबत एक टिप्पणी दिलेली होती. सहाय्यक संचालक न.र. यांनी ती टिप्पणी सर्व स.सदस्यांना द्यावी. कारण ती महत्वाची आहे. त्यावर आढावा घेतला गेला त्यात १००% सुविधा दिल्या अशा २० वसाहती आहे. त्यात ५१२२ घरे आहेत. त्या ठिकाणी सुविधा दिलेल्या आहेत. त्या सुविधा आता नादुरूस्त असतील तर तेथे देखभाल दुरूस्तीची कामे करता येतील. अशा सूचना संबंधीत अधिकाऱ्यांना दिलेल्या आहे. तसेच विविध हस्तांतरण दस्ताऐवजामध्ये रजिष्ट्रीचे कागदपत्र नसेल तर काही करता येणार नाही. अशा प्रकारचा खूलासा आल्यामूळे अडचण निर्माण झाली. गुंठेवारीच्या दराबाबत चर्चा झाली, त्याबाबत मी ही चर्चा केलेली आहे. शासनाने जे दर निश्चित केलेले आहे, तेच ठेवावे असा शासनाचा आग्रह नाही. या सभागृहाने निर्णय घ्यावा. दर कमी करू शकता,ठराव घेतला त्यावेळी सूध्दा भरपुर चर्चा झालेली होती. दर चौरस मीटर दराप्रमाणे काम करावयाचे ते होवू शकते का, ही खरी अडचण आहे. दर कमी केल्यास सर्वच सूविधा त्या भागात महापालिका पूरवू शकत नाही. म्हणून उर्वरीत पैसा महापालिकेच्या निधीतून खर्च करायचा का, किती पैसे लागणार आहे ही संपूर्ण माहिती त्या टिप्पणीत आहे. नेमके काय करावयाचे आहे, आयुक्त म्हणून मी माझे विचार सभागृहा समोर ठेवतो. ०४जानेवारी ला मा.प्रधान सचिव यांना सोयीस्कर पत्र दिले आहे. त्याच्या प्रती स.पदाधिकारी यांना देता येतील. यात ३ मुद्दे पून्हा शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेले आहे. पाच-दहा ईत्यादी मुल्यांच्या मुद्रांकावर खरेदीचे व्यवहार झालेले आहेत. त्या अडचणी आपण विचारात घ्याव्यात. व ज्या मिळकती या खाजगी असतील व निवासी क्षेत्रात येत असेल,गुंठेवारी कायद्या अंतर्गत येत असेल व नोंदणी झालेली नसेल व इतर तरतूदीची अर्जदार पूर्तता करीत असेल तर अशा मिळकतींना कलम ३ (२)(ड)

नूसार नियमित करण्याची परवानगी आवश्यक आहे. असे ठाम मत दिले.अनाधिकृत वसाहतीत देखभाल दुरूस्ती संदर्भात जानेवारी मध्ये शासन निर्णय आलेला आहे. त्याचा प्रशासनाने उल्लेख केलेला आहे.ज्या वसाहती नियमित होवून शकतील अशा वसाहतीस पथदिवे,तुंबलेली मलनिस:रण वाहीनी दुरूस्ती करणे, अशी कामे करण्यास हरकत नाही. परंतू अशा वस्त्यामध्ये नविन कामे करावयाची झाल्यास जसे जसे निधी उपलब्ध होईल, तसे करण्यात यावे. असे शासनाचे यापूर्वीच मार्गदर्शन आलेले आहे. देखभाल दुरूस्ती महानगरपालिकेच्या स्वत:च्या निधीतून करता येईल, परंतू पून्हा मालकी हक्का बाबतचा प्रश्न निर्माण होत [illegible] नवक स्वेच्छा निधी, निधी मधून देखभाल दुरूस्तीची कामे करण्यांची विशेष बाब म्हणून मजूरी द्यावी म्हणून अशी शिफारस केलेली आहे. उपसचिव नगर विकास विभाग यांना पून्हा भेटलो. आमदार,खासदार यांच्या निधी संदर्भात नियोजन विभागाकडे पाठपूरावा करावा.नगर विकास विभागाकडून नियोजन होत नाही,इतर महानगरपालिकेंनी सवलत घेतली या संदर्भात संबंधीत अधिकाऱ्यांना मी सूचना केलेल्या आहे. स्वेच्छा निधीच्या संदर्भात नगर विकास विभागाचा डेस्क २४ हा आहे, त्या ठिकाणी पाठपूरावा करण्याची गरज आहे. सिडको अधिसूचीत क्षेत्रातील डी नोटीफाईड झालेल्या वसाहतीतील मिळकतींना सूध्दा उपरोक्त बाब लागू पडते. जे मुंद्राकावर खरेदी केलेल्या असतील किंवा मुळातच खाजगी मालकीच्या असतील त्याही अधिकृत करण्याच्या परवानगी द्यावी या तीन्ही मुद्द्यांबाबत सर्व पदाधिकारी, विरोधी पक्षनेता यांनी येत्या ८ तारखेच्या मंत्री मंडळाच्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांचेकडे विनंती करण्याची गरज आहे. यश येण्याची दाट शक्यता आहे. सर्वांनी मिळून प्रयत्न करावा अशी विनंती आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : या संदर्भात सभागृहात अनेकवेळा चर्चा झालेली होती, वेळोवेळी मा.आयुक्तांनी पाठपूरावा केला,सर्वांची भावना असते की, आपलं घर व्हावं.अनाधिकृत भागात घरे झालेली आहेत,शासनाने हा कायदा सर्व महाराष्ट्रसाठी लागू केलेला आहे,नागपुर,पुणे या दोन महानगरपालिकेमध्ये उत्कृष्ट काम झालेले आहे. नागपुर हा आदर्श पॅटर्न ठरविण्यात आलेला आहे. शासनाने त्यांना १०० कोटी अनुदान दिले आहे. व पुणेला ही अनुदान मिळालेले आहे. पुणे महानगरपालिकेला भेट दिली असता, शासनाचे अनुदान व निधी यातून कामे केली. आपणांकडे अनुदान नाही, व निधीही नाही. आता ८ ते १० फेब्रुवारी ला मंत्रीमंडळाची बैठक आहे, त्यावेळेस मा.मुख्यमंत्री यांचे निदर्शनास आणून द्यावे,पुणे नागपुर प्रमाणे निधी द्यावा. बॉन्डची सवलत मागवावी. व सविस्तर निवेदन देण्यात यावे.

सौ.चंद्रभागाबाई दाणे : बडी गिरणी,मिलकॉर्नर या शाळेसाठी भूसंपादन करणेसाठी दि.२०.०६.२००१ ला पाहणी केली,त्या भागात चार रस्ते आहे.तीन चार वर्षापासून सारखा पाठपूरावा करण्यात येत आहे. अद्याप कार्यवाही केलेली नाही. या शाळेत गरीब मुले शिक्षण घेतात. ठराव होऊनही शाळेसाठी भूसंपाद का केले नाही.

श्री.जयवंत ओक : २००४ ला शासनाने काम करता येईल,अशी परवानगी आलेली आहे का.

मा.आयुक्त : कार्यकारी अभियंता श्री.डी.पी.कुलकर्णी यांनी खूलासा करतांना काम करण्यांत येईल असे सांगितलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे : विमानतळापासून १ कि.मी.अंतरापर्यंत घर बांधता येत नाही. परंतू विमानतळाच्या भिंतीला लागूनच म्हाडा,सिडको स्कीम केलेली आहे. हे शासनाचे धोरण बरोबर नाही. माझ्या वार्डातील १०० फाईल्स पडलेल्या आहेत.

श्री.स.अली सलामी : स.सदस्या शासनाच्या बाबतीत गंभीर दिसतात,सर्व भारतात व महाराष्ट्रात एन.डी.ए. ची पिछेहाट झाल्याने सहन होत नाही.विधानसभेच्या निवडणूकीचे परिणाम आहे.

श्री.भागवत कराड : वार्डामध्ये गुंठेवारीचे काम होत नाही, म्हणून चीड निर्माण झालेली आहे. ९ तारखेला मंत्री मंडळाच्या बैठकीत मा.आयुक्तांनी केलेल्या खूलाशा प्रमाणे मंत्री मंडळा समोर काय निवेदन द्यायचे हे सर्वांच्या लक्षात आलेच असेल मा.महापौर,मा.विरोधी पक्षनेता य[१२]दन द्यावे.

(याचवेळी सभागृहात जोरजोराने बोलणे चालू होते,काहीही ऐकू येत नाही.)

श्री.सुरजितसिंग खुंगर : बऱ्याच बैठकीनंतर आज सभागृहात चर्चा होत आहे, त्याबद्दल धन्यवाद. मा.आयुक्तांचे सुध्दा सर्वच पक्षाच्या सदस्यांनी अभिनंदन केलेले आहे. आम्ही पाच नामनिर्देशित सदस्य स्पेशल ड्युटीवर आहोत. प्रशासनास आमची कोठे मदत लागते ते देण्यांस आम्ही सदैव तयार आहोत. महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढवावे, शहराच्या विकासाची बाब लक्षात घ्यायला पाहीजे.उत्पन्न वाढले की,पैसा खर्च करू शकतो. जुन २००० जाहीरात फलकेचा विषय सभागृहात मी काढला होता, सभागृहाने माझे अभिनंदनही केले,२००० च्या शेवट पर्यंत संचिका दाबली गेली. तत्कि ालीन आयुक्त श्री.बलदेवसिंग यांनी ती संचिका काढली होती पून्हा गायब करण्यात आली. कार्यवाही झाली नाही. यापासून फक्त २ लाख प्रतिवर्षी उत्पन्न येत होते. आपण सर्वांच्या मदतीने आता ते रू.१ कोटी पर्यंत गेले. सेल ॲड कंपनीला याचा ठेका देण्यांत आला त्यांच्याकडे ५९ लाख रूपये थकबाकी आहे. व १० लाख जाहीरात पोलचे आहे. सदर कंपनीसह निविदा व करारनाम्या मध्ये लाईट देण्याचा उल्लेख नाही. विद्युत व्यवस्था त्यांनी स्वत: करायची, किती विद्युत ची चोरी होते, याबद्दल मी तपासणी करायच्या सूचना केल्या होत्या, हे जर खोटे असेल तर मी दंड भरायला तयार आहे. मा.न्यायालयाने जाहीरात फलका बाबत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले, परंतू पून्हा जाहीरात फलक लावणे चालू दिसते. होर्डींग लावतांना फोटो काढले आपण जर महापालिकेच्या तिजोरीत पैसे आणले नाही तर वार्डात कामे कसे होणार दिल्लीला जावून खासदार फंडातून १०-१० लाख रूपये ५० खासदाराकडून जमा केल्यास ५कोटी रक्कम उपलब्ध होते,नियोजनाची आवश्यकता आहे. दोन चार महिने राहीले प्रयत्न करावे, अधिकारी व पदाधिकारी यांचे प्रयत्नांची गरज आहे.या संदर्भात मा.आयुक्तांनी बैठक घ्यावी.जी याचिका न्यायालयात दाखल आहे,ती कोणत्या स्तरावर आहे. याबाबत मा.आयुक्तांनी दखल घ्यावी.सेल ॲड वर कार्यवाही करणे आवश्यक आहे. आय.आर.सी.नियमावलींची दखल घेतली जात नाही. मा.आयुक्तांना आज भेटलो,दखल घेण्याचे त्यांनी मान्य केले. मा.महापौरांनी दखल घ्यावी. मी ही बाब सभागृहाच्या समोर आणलेली आहे. मोबाईल टॉवर्सबद्दल कार्यवाही होत नाही. भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. भोगवटा प्रमाणपत्र घेतल्यावरच परवानगी द्यावी. मला लेखी देण्यांत आले आहे की,इतके अधिकृत,इतके अनाधिकृत आहे. महाराष्ट्र शासनाचे अतिक्रमण हटावणे बाबत कडक आदेश आहेत,हलगर्जी पणा करणाऱ्यांना निलंबीत करण्याचे अधिकार मा.आयुक्तांना आहे. पोलीस कुमक देणेसाठी हलगर्जी पणा झाला तर त्यांनाही निलंबीत करण्याचे अधिकार आहे. इतर महापालिकेकडून माहिती घ्यावी. इतर एजन्सी हे काम घ्यायला तयार असेल तर त्यांना द्यावे. महापालिकेचे उत्पन वाढावे अशी अपेक्षा आहे. (यावेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलतात,काहीही ऐकू येत

नाही.) मुंबई महानगरपालिकेने जशी भूमिका घेतली, तशी भूमिका औरंगाबाद महानगरपालिकेने घेतली तर खूप फरक पडेल.मी तीन चार महिन्या पासून विषय मांडत आहे. आजच मला उत्तर मिळाले आहे की,सत्तावन जाहीरात फलकांना छतावर परवानगी दिली,त्यामध्ये ३९ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्रच नाही. भोगवटा प्रमाणपत्र नसल्यामूळे ०१.०४.२००४ ते ३१.१२. २००४ पर्यंत दंडात्मक कार्यवाही केलेली आहे. ०१.०१.२००५ पासून सदर होर्डींग काढण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यांत येईल. ०१.०१.२००४ च्या पूर्वीचे पैसे कोठे गेले. सर्वांनी विकास कामासाठी एकत्रित यावे. मा.आयुक्त बोलल्याप्रमाणे मा.मुख्यमंत्री यांची भेट घ्यावी.

श्री.संजय शिरसाट : स.सदस्य श्री.खुंगर हे अभ्यासू नगरसेवक म्हणून ओळखले जातात,त्यांनी महत्वाचा विषय प्रशासना समोर मांडलेला आहे. एकदा विषय सुरू झाला की, त्या विषयावर ते बराच वेळ बोलतात,स्थायी समिती मध्ये सेल ॲड चा प्रश्न उपस्थित झाला होता ८लाख खर्च करून कंपनी मार्फत सर्वे करण्यात आला,निविदा काढण्यात आल्या. १कोटी मिळेल,परंतू सेल ॲड यांनी धोका दिला,स्थायी समितीने ताबडतोब कार्यवाही करण्याचे आदेश दिले. निविदाप्रमाणे त्यांचेकडून रक्कम वसूल करावी, मोठ्यात मोठा वकील लावून न्यायालयातून जैसे थे परिस्थिती उठवून घ्यावी. स.सदस्यांनी मांडलेल्या प्रश्नास आमची सम्मती आहे. महानगरपालिकेचे हित जपण्यासाठी स.सदस्य श्री.खुंगर यांनी त्यांचे पक्षाचे वरीष्ठ नेते ना.श्री.शरदरावजी पवार यांचेकडे खासदार निधीतून रक्कम मागविण्याची शिफारस केली तर योग्यच होईल. आम्ही सर्व सदस्य त्यांचे पाठीशी आहोत. ए.टी.अँड टी.कंपनीचे टॉवर असो किंवा बी.पी.एल.असो शंकेने नगरसेवकांकडे पाहतात,त्यांना सिमकार्ड दिले काय शंका असते. स.सदस्य डीलर असतांना प्रश्न उपस्थित केला की,टॉवर खाली पाडावे, त्यास सभागृहाची सम्मती आहे. नुसते पत्र देवून थांबू नका.

श्री.सुरजितसिंग खुंगर : आम्ही जे बोलतो त्याला वेगळे घेवू नये,५० खासदारांकडून निश्चित निधी मिळेल आमच्या बरोबर चला. नागरीकांचे हित संरक्षित करता येईल,त्याकडे लक्ष द्यावे. स्थायी समितीमध्ये सेल ॲड बद्दल चर्चा झाली,आपले अभिनंदन करतो. दिल्लीला जावून आम्ही ५० खासदारांचे पत्र आणू शकतो. कोर्टातील प्रकरणांबाबत प्रशासनाने खूलासा करावा.

श्री.भगवान घडमोडे : नामनिर्देशित पालिका सदस्यांचे श्री.खुंगर यांनी पोटतिडकीने मुद्दे उपस्थित करून प्रश्न मांडले त्यांना बगल न देता सेल ॲड कडे किती थकीत रक्कम आहे,सर्वसाधारण सभेमध्ये सविस्तर खूलासा व्हावा.स्थगिती असतांना कमीनी व जाहीरात पोल कसे लावण्यात येते. महापालिकेला बुडवितो,कृपया हसण्यावर न नेता गंभीरतेने विचार करून प्रशासनाने खूलासा करावा. यात आपले वकील मॅनेज झाले आहेत का? याचा पण गंभीरतेने विचार करावा.

श्री.भागवत कराड : महानगरपालिकेचे जाहीरात फलकाच्या निविदेपासून मिळणारे उत्पन्न घटले आहे. दिशादर्शक फलकावर निविदेत विद्युत पुरवठ्याची अट नसतांना का दिले,चौकशी करण्यांत यावी.मा.न्यायालयाचे जैसे थे आदेश असतांना देखील का कारवाई होत नाही. काही ॲडव्हर्टायझर इमारतीवर जाहीरात फलक लावण्यात आलेले आहे, त्यांनी लाखो रूपयांचे ड्राफ्ट दिले, बँकेत ते वटले नाही.

महापालिकेचे नुकसान होत आहे,व रोखीने रक्कमही जमा करीत नाही. कोण जबाबदार आहे, मा.आयुक्तांनी लक्ष घालावे.

मा.आयुक्त : जाहीरात फलकाच्या संदर्भात स.पदाधिकारी तसेच स्थायी समिती सभेत चर्चा झाली.काही प्रमाणे थोड्या कालावधी साठी दिली गेली होती. ते उपआयुक्त श्री.शिंदे यांचे कालावधी दिलेली आहे.सद्या विद्यमान उपआयुक्त (म.) यांना आढावा घेण्याच्या सूचना दिलेल्या आहे. आढावा पूर्ण होत आहे. दोन वर्षापूर्वी राज्यासाठी विनियम तयार करण्यात आले, ते समोर ठेवून उपआयुक्त (म.) यांनी काम करणे आवश्यक आहे. भोगवटा प्रमाणपत्र आवश्यक आहे,असे त्यात नमूद केलेले आहे, ते तपासून उपआयुक्त (म.) यांनी परवानगी दिली आहे किंवा नाही याबद्दल उपआयुक्त (म.) यांच[illegible]ता मागवण्यात [illegible] (म.) यांनी खूलासा करावा. दूसरा विषय टॉवरच्या संदर्भात निघाला, त्यासंदर्भात स.स.न.र. श्री.राठोड व प्रशासकीय अधिकारी श्री.जरारे यांच्यासह दोन वेळा चर्चा केली. ते माहितीचा तपशिल देतील. सुरक्षात्मक कार्यवाही आवश्यक आहे.श्री.जरारे व त्यांच्या हाताखालील कर्मचारी यांना सूचना दिलेल्या आहेत. त्याचा अहवाल आपल्या समोर येईलच.५७ परवाने दिले पैकी ३९ भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतीवर आहे. सविस्तर माहिती उपआयुक्त (म.) देतील. ते प्रत्येक संचिका तपासतील,चेकची वसूली झाली नाही याबद्दल लेखी अहवाल प्राप्त आहे. सुमारे २६ लक्ष इतकी रक्कम आहे. ते धनादेश का स्विकारले गेले नाही,याची माहिती घेण्यासाठी संबंधितांना सूचना दिल्या आहे.

श्री.भागवत कराड : निविदेमध्ये अट नव्हती त्यांनी एम.एस.ई.बी.कडून घ्यावयास पाहीजे होते.

मा.आयुक्त : याबद्दल अति.शहर अभियंता खूलासा करतील व जाहीरात फलका संबंधी उपआयुक्त (म.)खूलासा करतील.

श्री.स.अली सलामी : जाहीरात कमानीतील प्रकाश प्रखरतेने डोळ्यावर येतो.

मा.आयुक्त : महत्वाचा मुद्दा आहे,डोळे दिपवणारा प्रकाश आहे, मी स्वत: पाहीले आहे. शहर अभियंता यांना स्वत: पाहण्याच्या सूचना दिलेल्या आहे.संबंधीत अधिकाऱ्यांनी खूलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : सेल ॲड यांना महापालिकेतर्फे जाहीरात फलकाची परवानगी दिली ५६ लाख रूपये त्यांचेकडे थकबाकी आहे. त्यांनी न्यायालयातून जैसे थे आदेश प्राप्त करून घेतले आहे. या प्रकरणांत महापालिकेतर्फे कॅव्हेट दाखल केले होते. महानगरपालिकेचे वकीला मार्फत ५६ लाख रूपये भरणा करणे बाबत न्यायालयात मागणी करण्यात आली होती, मा.न्यायालयाचे जैसे थे आदेश असतांना सूध्दा जाहीरात फलक लावणे सुरू ठेवले होते. पंचनामा करून व फोटो काढून ही बाब मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. २९ जानेवारी रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली आहे.

श्री.भागवत कराड : निविदेमध्ये प्रकाश व्यवस्थेची अट नव्हती,विद्युत पूरवठा कसा देण्यात आला.

श्री.नासेरखान कुरैशी : कमानीवर जाहीराती साठीच जास्त जागा व दिशा दर्शक फलकासाठी लहान जागा असे करारनाम्या मध्ये झालेले आहे का?

श्री.भगवान घडमोडे : सध्या चेंडू न्यायालयात आहे. काही करता येत नाही.कॅव्हेट कोणत्या कोर्टात आणि केस कोणत्या कोर्टात आहे.

विधी सल्लागार : सेल ॲड ची निविदा रद्द करण्यात आली, तीन कोर्टात कॅव्हेट दाखल करण्यांत आले, जिल्हा न्यायालयात प्रकरण दाखल झाले, महापालिकेतर्फे थकबाकीची

रक्कम प्रथम महापालिकेकडे जमा करावी असा विनंती अर्ज -जवाब दाखल केलेले आहे. प्रकरण २९.०१.२००५ रोजी आदेशासाठी ठेवलेले आहे.

श्री.सुनिल मगरे : विद्युत पूरवठा देण्याची तरतूद नसतांना का देण्यांत आली.

अति.शहर अभियंता : महानगरपालिकेतर्फे विविध ठिकाणी बी.ओ.टी.पध्दतीने कमानी उभारणेसाठी जाहीर निविदा काढण्यात आल्या होत्या,कामही झाले,बांधा वापरा आणि हस्तांतर करा या धर्तीवर कमानीतील आर्धा भाग महानगरपालिकेसाठी व अर्धा भाग जाहीरातीसाठी. जाहीरातीसाठी प्रकाश व्यवस्था ठेकेदाराने मीटर घेवून स्वत: केलेले आहे.आजपर्यंत आपणांकडून घेत असल्याचे एकही पुरावा आढळले नाही.

श्री.भागवत कराड : अति.शहर अभियंता व मालमत्ता अधिकारी यांनी कमानी लावू नका असे एका ठिकाणी सांगितले असतांना देखील त्या ठिकाणी कमानी उभारण्यात आलेल्या आहे. याबद्दल काय कार्यवाही करणार.

श्री.सुरजितसिंग खुंगर : चौकशी केली असता, प्रकाश व्यवस्थेवर जवळपास सहा हजाराचे बील आले असते. परंतू त्यांनी बील भरलेले दिसत नाही. याची तपासणी व्हावयास पाहीजे. कोणी याची क्रॉस चेकींग केली पाहीजे, मी लाईट घेतांना धरले. मागील दिड वर्षात बील आलेले नाही. महानगरपालिकेला किती चूना लावला. उत्पन्न काही नाही परंतू लाखोंचे नुकसान महापालिकेला झालेले आहे. त्याला कारणे दाखवा नोटीस का दिली नाही.

श्री.सुनिल मगरे : अति.शहर अभियंता यांनी खूलासा केला आहे की, सेल ॲड यांनी स्ट्रीट लाईट मधून कनेक्शन घेतलेले नाही. स.सदस्य श्री.खुंगर यांनी आरोप केलेले आहे, सेल ॲड वर मात्र कारवाई केली पाहीजे.

अति.शहर अभियंता : व्हीजन कम्युनिकेशन यांना आकाशवाणी जवळील एक कमानीसाठी मालमत्ता अधिकारी व अति.शहर अभियंता यांनी आक्षेप घेतला होता पत्रही दिले, कारणे दाखवा नोटीस दिली.

श्री.भागवत कराड : कमानीवर दिशादर्शक फलकाच्या लगत जाहीरातीसाठी महापालिकेचा विद्युत वापर होत असेल तर एका कमानीवर ५ ते १० हजार रू.विद्युत बील येते. त्यांचेवर ताबडतोब कारवाई करावी, काळ्या यादीत टाका,त्यांचा वीज वापर कसा होतो व आतापर्यंत किती वीज वापर झाला याबद्दल माहिती द्यावी.

श्री.सुरजितसिंग खुंगर : आम्ही फिल्ड मध्ये आहोत,आम्हाला माहित आहे, सेल ॲड यांचे कडून वीज बिलाची रक्कम वसूल करावी. तसे आदेश द्यावे. यांना ॲड पोल वर विद्युत पूरवठा द्यायचे निविदेत नाही व करारनाम्या मध्ये घेतले १० लाख रूपये बील येईल,तेवढे वसूल करावे,कडक आदेश द्यावे.

श्री.भागवत कराड : चोरी होत असेल तर दंडात्मक कारवाई करून वसूल करावे.

श्री.नंदकुमार घोडेले : असे काहीच झालेले नाही. असे अति.शहर अभियंता यांनी खूलासा केलेला आहे. त्यांनी वेळेवर निदर्शनास आणून द्यायला पाहीजे,ठोस पुरावे द्यावे.

श्री.सुरजितसिंग खुंगर : केबल चेक करायचे काम एम.एस.ई.बी.चे आहे. मी स्वत: पकडले, खाजगी व्यक्तींना केबल चेंज करता येत नाही. मी एम.एस.ई.बी. श्री.निधोनकर यांना विचारणा केली आहे.

श्री.भागवत कराड : स.सदस्य जबाबदारीने बोलतात त्यांनी चोरून विद्युत पूरवठा घेतला असेल तर त्यांचेवर कारवाई करा.

श्री.सुरजितसिंग खुंगर : म.रा.वि.म. मागील बीले पाहून अव्हेरेज बील देतात, मी तीन महिन्यापासून प्रश्न मांडतो,उचित कारवाई करण्याचे आदेश द्यावेत.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : आरोप केले तर त्याचा खूलासा व्हावा. महानगरपालिकेच्या स्ट्रीट लाईट मधून विज चोरी होते का?

श्री.नंदकुमार घोडेले : श्री.डी.पी.कुलकर्णी साहेब हे कार्यकारी अभियंता (वि.) आहेत, महापालिकेचे असते तर त्यांनी पंचनामा करून कारवाई करायची असती, तो एम.एस.ई.बी.चा प्रश्न आहे.

श्री.ईलियास किरमाणी : कारवाईचे आदेश द्यावेत.

श्री.भागवत कराड, श्री.सुनिल मगरे : त्यांचेवर कार्यवाही करा.

१६

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

श्री.सुरजितसिंग खुंगर : कार्यवाहीचे आदेश द्यावे.

मा.महापौर : संबंधीत अधिकारी यांना आदेश देण्यात येतात,योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.किशनचंद तनवाणी : महानगरपालिकेची विज चोरी होत असेल तर गुन्हा दाखल करावा.

श्री.ईलियास किरमाणी : एम.एस.ई.बी. ला आपण पैसे भरणा करतो जनतेचा पैसा आहे. याबद्दल आवश्यक ती दखल घेण्यांत यावी.

श्री.भागवत कराड : स.सदस्य श्री.खुंगर यांची तक्रार आहे. चोरी केली असेल तर कारवाई करण्यांत यावी.

श्री.ईलियास किरमाणी : आपण विश्वस्त आहोत. पंचनामा,रिपोर्ट आहे. एफ.आय.आर. दाखल करा. एम.एस.ई.बी. ला बिल आपण भरतो.

श्री.स.अली सलामी : स.सदस्य श्री.खुंगर यांनी आरोप केलेले बरोबर आहे,संबंधित एजन्सी धारक विजेची चोरी करतो आहे, त्या होर्डींग्ज वर किती बील येते,कोठे भरणा केला जातो. महापालिकेला पूर्वीचे बील किती येत होते,आता होर्डींग्ज लावल्यापासून किती येते. ५६ लक्षचे महापालिकेचे नुकसान होत आहे.महापालिकेच्या हिताचे नाही. मा.आयुक्त यांनी चौकशी करावी.

श्री.सुरजितसिंग खुंगर : स्ट्रीट लाईन वरून विज पूरवठा घेतलेला होता, आता माहिती मिळाल्यास बंद करेल. प्रत्यक्ष तपासणी करण्याचे काम प्रशासनाचे आहे.

श्री.भागवत कराड : त्यांनी विद्युत व्यवस्था स्वत: करावयाची आहे. स.स.श्री.खुंगर यांनी निदर्शनास आणून दिले. स.सदस्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले : विज चोरी करीत असेल तर मा.आयुक्त चौकशी करतील त्यानूसार कार्यवाही होईल.

मा.महापौर : या बाबत मा.आयुक्त यांनी चौकशी करावी.

श्री.भगवान रगडे : गेल्या ५ वर्षात ५ महापौर होवून गेले, याच कालावधीत १४ आयुक्त येथे बदलीवर येवून गेले. परंतू मी सतत गेल्या ५ वर्षापासून मिसारवाडी भाग स्लम घोषित करण्याबाबत प्रश्न मांडतो आहे, परंतू हा भाग स्लम घोषित झालेला नाही. का झालेला नाही खुलासा आज अपेक्षित आहे.

मा.महापौर : संबंधित अधिकारी यांनी खूलासा करावा, स.सदस्यांचा हा प्रश्न बऱ्याच वेळा उपस्थित केलेला आहे.

श्री.भगवान रगडे : मी शासनास पत्र दिले होते, त्यांचे उत्तर मा.आयुक्त यांना सचिव यांनी पाठविले आहे. मा.आयुक्तांनी खूलासा करावा. शासनाचे काय उत्तर आले. अशी माहिती हाती आली की, हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची गरज नव्हती ही बाब

शासनाची नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अख्त्यारीत हा विषय आहे. असे शासनाने म्हटले आहे. तर शासनाकडे प्रस्ताव पाठवून मिसारवाडी भाग स्लम घोषित करण्यास ५ वर्षाचा वेळ का घालविला यास जबाबदार कोण. अधिकाऱ्यांनी सभागृहात उत्तरे देऊन सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. शासनास कशासाठी बदनाम करीत आहे.

उपआयुक्त (प्र.) : मसनतपूर,ब्रीजवाडी व इतर काही भागाचे सर्वे करण्याचे काम महापालिकेने हाती घेतलेले आहे. मिसारवाडी स्लम घोषित बाबतचा मुद्दा स्थायी समिती सभेत सुध्दा उपस्थित झालेला होता. त्या अनुषंगाने महापालिकेने शासनाकडे पाठपूरावा केलेला आहे.

श्री.भगवान रगडे : उडवाउडवीची उत्तरे नको आ[illegible]नाचे पत्र आले, हा विषय महापालिकेच्या आख्त्यारीत येतो, स्लम घोषि[illegible]चे असेल तर [illegible] घ्यावा,चूक प्रशासन करते शासनाकडे बोट दाखवते.

१७

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

श्री.काशिनाथ कोकाटे : मिसारवाडी भाग स्लम घोषित संदर्भात जे पत्र शासनाकडून आले, ते मा.आयुक्त यांचे नांवे आलेले आहे. तसे पत्र आलेले असेल तर सविस्तर खूलासा मा.आयुक्त यांनी करावा.

उपआयुक्त (प्र.) : शासनाचे पत्र प्राप्त झालेले आहे, व त्या पत्रात नमूद केले की,गृहनिर्माण विभागाशी संपर्क साधावा. त्या अनुषंगाने प्रकल्प विभागामार्फत संबंधित विभागास पत्र दिले. त्यासाठी प्रकल्प अधिकारी यांची नेमणूक केली. त्या विभागाशी म्हणजे शासनाच्या गृह निर्माण विभागाशी महापालिका संपर्कात आहे. त्यांची परवानगी घेवून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.भगवान रगडे : स्लम घोषित करण्याचे प्रशासनास माहित नाही. गेल्या ५ वर्षापासून मी प्रश्न मांडतो. स्लम घोषित करण्यासाठी काय कार्यवाही करावी लागते. कोणते कागदपत्र लागतात या बाबत अधिकाऱ्यांना माहित नसावे.नेमके अधिकार कोणास आहे. नगर रचना विभागाकडून एक पत्र आले इतकी जागा वगळावी लागेल. या शहरात ५२ स्लम भाग आहे. काही सरकारी जमिनीवर आहेत. शाळेसाठी, उद्यानासाठी जागा सोडावी लागेल असे पत्र मिळाले. ही स्लम घोषित भागात करता येते का? गेल्या ५ वर्षापासून प्रश्न मांडतो आहे, हा स्लम घोषित प्रश्न कोणत्या विभागाशी संबंधीत आहे, खूलासा करावा. स्लम मध्ये शाळा,उद्यान सोडावे लागेल. स्लम मध्ये सोडावे लागेल स्लम मध्ये व्याख्या आहे का?

सहाय्यक संचालक न.र. : स्लम घोषित करण्याच्या प्रस्तावास जेंव्हा सुरूवात झाली, त्याच कालावधी मध्ये गुंठेवारी कायदा लागू झाला. गुंठेवारी व स्लम घोषित करणे हा एकच भाग होतो, म्हणून गुंठेवारी कायदा आल्यामूळे आता स्लम घोषित करता येणार नाही, असे गृहीत झाले. यानंतर श्री.जावरे व श्री.वझे हे अधिकारी या संदर्भात मुंबईला मंत्रालयात जाऊन आले, तेंव्हा असे सांगण्यात आले की, गुंठेवारी व स्लम घोषित करणे हे दोन विषय वेगळे आहेत. मिसारवाडी भाग स्लम घोषित करण्यासाठी तेथील बांधकामाचा दर्जा काय? कोणत्या सुविधा आहेत. पात्र ठरत असेल तर पूढील कार्यवाही करण्यात येईल.

मा.आयुक्त : हा प्रश्न जूना आहे, ५ वर्षात का झाले नाही, मी ५ वर्षापासून येथे असतो तर निश्चित खूलासा केला असता. मागील १ ते दिड वर्षापासून हा प्रश्न माझ्या समोर आला. व तो प्रलंबित आहे हे स्पष्ट आहे. ही वसाहत गुंठेवारी कायद्याच्या अंतर्गत येते, परंतू ठराव झाला स्लम घोषित करण्याचा त्यानूसार ही कार्यवाही गृह निर्माण विभागा अंतर्गत करावी म्हणून आताच सहाय्यक संचालक न.र. यांनी खूलासा

केलेला आहे. गृह निर्माण विभागात या बाबतीत जो कायदा झालेला आहे, त्यानूसार हा प्रश्न हाताळण्या बाबत निश्चित केले आहे. त्यासाठी सर्वे सुरू केलेला आहे. प्रकल्प संचालक यांचे काम महत्वाचे आहे. त्यांना लेखी सूचना दिल्या आहेत. तशा सूचना दिलेल्या आहेत. दोन वर्ष त्यांनी दुर्लक्ष केले. सहाय्यक संचालक न.र. व प्रकल्प संचालक या दोन विभागामध्ये हा प्रस्तावाची कार्यवाही होत होती. परंतू आता सर्वेक्षणाचे काम चालू आहे. कोणकोणत्या सुविधा तेथे देता येतील ते गुंठेवारी अंतर्गत की, स्लम अंतर्गत द्यावयाचे ते तपासून नियमित बैठका घेण्यात येतील सक्षम प्राधिकरण कोण आहे. कायद्याच्या तरतूदी प्रमाणे कार्यवाही करण्याचे संबंधीत अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : कटकट गेट,एस.टी.कॉलनी भागातील नाल्यावरील संरक्षीत भिंतीचे १५ लाखाचे काम पाडण्यात आलेले होते, व [illegible]ने,सदरचे काम [illegible] तून करण्यात आले असे समजले. यानतर पावसाळ्याच्या दिवसात नाल्याच पाणी येऊन गरीब लोकांच्या घरात पाणी गेले त्यांचे नुकसान झाले या सभागृहात या संदर्भात चर्चा झालेली होती, चौकशी समिती नियूक्त केलेली होती तीन महिन्यात अहवाल देणार होते. अद्याप अहवाल समोर आलेला नाही. ७-८ महिने झाले अहवाल नाही. जमीन माफिया व अधिकाऱ्यांचे संबंध आहे. अद्याप मोजणी केली नाही. चौकशी अहवाल मिळाला नाही.

१८

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

उपआयुक्त (प्र.) : या प्रश्ना बाबत स.सदस्य जेंव्हा उपोषणास बसले होते, तेंव्हा मा.महापौर यांनी आश्वासन दिलेले होते. ३ महिन्यात या बाबत चौकशी करून अहवाल देण्यात येईल. असे सांगण्यात आले होते. याबाबत निवृत्त कार्यकारी अभियंता श्री.वरदे यांची चौकशी करण्यासाठी नियूक्ती केलेली होती. त्याचा चौकशी अहवाल आलेला आहे. प्रत दिलेली आहे.

मा.आयुक्त : सक्षम अधिकारी यासाठी नियूक्त केलेले होते, त्याचा अहवाल आलेला आहे. अहवाल कोणी कधी त्याचा जावक क्र. काय, कोणास दिला ई.माहिती द्यावी.

सौ.कुसुमताई खरात : वार्ड क्र.४४ मध्ये रोजाबाग भागात नागरीकांना नहरचे पाणी पिण्यास दिले जाते, नहर बंद झाली बारव/विहीरीचे पाणी दिले जाते. ते पाणी घाण असून जनावरे सुध्दा पित नाही. बांधकामासाठी वापर होत नाही असे पाणी पिण्यासाठी तेथील जनतेला दिल्या जाते. यापूर्वी त्या भागात १५० लोकांना डेंग्यू या आजाराची लागण झालेली होती. त्या लोकांना घाटी दवाखान्यात पाठविण्यात आले होते. त्यावेळी डॉ.कराड हे महापौर होते. त्यांनी व सर्व पदाधिकारी यांनी प्रत्यक्ष रूग्णांना भेटही दिली होती.या शहरातील १२ लक्ष जनतेला पैठणचे पिण्याचे पाणी दिले जाते, फक्त एकाच भागात का नहरचे पाणी दिले जाते त्यांचे साठीच पाणी पूरवठा कमी पडतो का, दिल्लीगेट पर्यंत पाईप लाईन टाकलेली आहे. त्या जवळील भागात छत्रपती नगर, भारतमाता नगर भागात पिण्याचे पाणी दिले जाते. फक्त हा भाग तेथून १०० फुट अंतरावर आहे या भागासाठीच का पाणी दिले जात नाही.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : नहरचे पाणी येते, ते फिल्टर केले जाते. ५० वर्षापासून ते पाणी वापरतो. गुणवत्ता चांगली आहे. त्यात ब्लिचींग व तुरटी टाकण्यात येते. त्याची तपासणी होते. त्यानंतरच ते पाणी पूरवठा करतो ते पाणी घाण आहे असे म्हणने अयोग्य आहे. वर्षानूवर्ष वापरतो. दुसरी बाब अशी की, जी नैसर्गिक साधन सामुग्री महापालिकेकडे आहे, त्याचा सुध्दा वापर करायला हवा नैसर्गिक स्त्रोत म्हणून तेथून पाणी दिल्या जाते. पाणी पुरवठ्यावरील खर्च कमी होतो. यापूर्वी जो डेंग्यूचा आजार झाला तो पाण्यामूळे झाला नाही.

श्री.भगवान रगडे : त्या पाण्यात तुरटी टाकतो इतर शहरात सर्वच ठिकाणी पाणी दिल्या जाते फक्त तेव्हढ्या एका वस्तीसाठीच पाणी नाही का? जो खूलासा केला तो समाधानकारक नाही. १५ दिवसात त्या भागात पाण्याची पाईप लाईन टाकून त्या भागास पाणी पूरवठा करावा नहरचे / विहीरीचे पाणी देण्यात येऊ नये. असे आदेश करावे, त्या भागात मागे डेंग्यूचा आजार झालेला होता. गांभीर्याने बाब लक्षात घ्यावी.

मा.महापौर : रोजाबाग भागासाठी पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्यात यावी. असे आदेश देण्यात येत आहे.

श्री.नंदकुमार घोडेले : महापालिकेच्या निवडणूकीची पूर्ण तयारी झालेली आहे. त्याच्या प्रारूप सूध्दा दाखल झाले. परंतू अत्यंत महत्वपूर्ण असलेला गारखेडातील शिवाजीनगर हा भाग यातून वगळल्या गेला सन २००० च्या सार्वत्रिक निवडणूकीत हा भाग वगळला गेला होता. न्यायालयात प्रकरण दाखल झालेले होते. न्यायालयाने आदेश केले की, एक तर हा भाग महापालिका हद्दीत समावेश करावा नसता स्वंतत्र नगर पंचायत व्हावी व तसे शासनास व महापालिकेस निर्देश होते. त्यामूळे त्या नागरीकांना अपेक्षा होती की, किमान पूढच्या वेळी मतदानाचा हक्क मिळेल. आशा मावळल्या आहे. स्थायी समिती सभा व सर्वसाधारण सभेने आदेश दिलेले आहे. परंतू महापालिकेच्या वतीने शासनाकडे योग्य पध्दतीने पाठपूरावा करावा. तो भाग महापालिका हद्दीत घेतला गेला नाही.१५ तारखेला मा.निवडणूक आयुक्त श्री.नंदलाल येथे आलेले होते, त्यांचेकडेही एक निवेदन दिले व शिवाजीनगर भाग हा महापालिकेत समावेश करून तेथील मतदारांना येणाऱ्या महापालिकेच्या निवडणूकीत मतदानाचा हक्क देता येईल अशी कार्यवाही व्हावी. परंतू त्यांचेकडून समाधान कारक उत्तर मिळालेले नाही. त्यांनी असे म्हटले की, ही हद्द जर महापालिकेमध्ये असेल तरच त्यांचा वार्ड रचनेमध्ये विचार करता येईल. नसता विचार करता येणार नाही या संदर्भात मा.आयुक्तांनी वेळोवेळी शासनास या संबंधी पाठपूरावा केलेला आहे, ग्रामपंचायतचे पत्र सुध्दा दिलेले आहे. स्थायी समितीचा ठराव, सर्वसाधारण सभेचा ठराव व उच्च न्यायालयाची प्रत सुध्दा शासनास दिलेली आहे. उच्च न्यायालयाने काय आदेश दिले होते, निवडणूक आयोगास ते लागू होतात की नाही. महानगरपालिकेस सूध्दा तयात पार्टी करण्यात आले होते. अशा परिस्थितीत आनंदाची बातमी की, व अभिमान वाटतो व अभिनंदन करावेसे वाटते. या शहराचे खासदार मा.श्री.खैरे साहेब यांनी याची दखल घेतली व मुख्य निवडणूक आयुक्त यांना पत्र व्यवहार करून त्यांनी सांगितले की, यात चांगला मार्ग काढून त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले ते त्यांचे मार्फत जाहीर करतील या प्रकरणात महापालिका कोठे कमी पडते. महापालिकेने प्रयत्न करून सुध्दा यश का मिळाले नाही. या बाबत खूलासा विधी विभाग किंवा सहाय्यक संचालक जे कोणी संबंधित अधिकारी असतील त्यांनी करावा. शासनास जी माहिती अपेक्षित होती ती का पुरविण्यात आलेली नाही. जर या भागाचा समावेश झाला नाही, तर त्या मतदारांना मतदाना पासून वंचीत राहावे लागणार आहे, ही दुर्दैवाची बाब आहे. मा.उच्च न्यायालयाचे काय आदेश आहे महापालिका सूध्दा त्यात पार्टी आहे. मागील दोन वर्षाचा कालावधी गेला हा भाग समावेश का झालेला नाही. कोण कमी पडले व त्या लोकांना मतदान करण्याचा हक्क मिळाला नाही. उदा. मा.उच्च न्यायालयात अर्ज देवून महानगरपालिकेस आदेश होते की नाही पहावे. या प्रकरणात जबाबदार कोण हा प्रश्न आहे.

मा.आयुक्त : निवडणूक आयुक्त यांचे जे सर्क्यूलर आहे, राज्य शासन पाहते. पध्दतीने मी प्रयत्न केलेले आहे. मी राज्य शासनाला पाठपूरावा केला. विधी सल्लागार यांचेकडे तो निर्णय आला आहे.तसा उल्लेख अहवालात केलेला आहे. याबाबत मी आयुक्त म्हणून खूप पाठपुरावा केलेला आहे. शासन पातळीवर दाखवितात त्यापलिकडे आपण बोलणे योग्य नाही.

श्री.नंदकुमार घोडेले : हा भाग एक तर नगर पंचायत म्हणन घोषित करावा किंवा महापालिकेत समावेश करावा असे आदेश होते. यात २० नका व शासनास पार्टी करण्यात आलेले होते.

विधी सल्लागार : या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे आदेश होते, शासनाने शासन पातळीवर कार्यवाही करावी. त्याची माहिती सहाय्यक संचालक न.र. मार्फत करून दिलेली आहे. शासनाकडून अंतिम निर्णय होईल. शासनाकडून इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५ सद्य:स्थितीत माझ्याकडे माहिती नाही परंतू हा भाग नगर पंचायत म्हणून घोषित करावा किंवा महापालिकेत समावेश करण्याचा विचार करावा असे शासनास निर्देश होते.

श्री.नासेरखान कुरैशी : यापूर्वीच जेष्ठ सदस्य श्री.खुंगर यांनी चांगला मुद्दा उपस्थित केला एका सिल्लेखाना जागेच्या संदर्भात तीन तीन कोर्टात प्रकरण चालते, कॅव्हेट दाखल होते, तरी संबंधीतास स्थगिती आदेश मिळतात. कॅव्हेट दाखल केले, त्याचवेळी स.सदस्या शाहीन जफर यांचेवर हल्ला झाला.प्रश्न उपस्थित केला की, मा.उच्च न्यायालयाचे आदेश होते, चर्चा बंद होते. मा.न्यायालयाचे आदेश होतात कसे त्या आधीच कॅव्हेट का दाखल होत नाही. मा.न्यायालयाचे तीन वेळेस आदेश होते तरी ही अतिक्रमण काढले नाही. तसेच स.सदस्या शाहीन जफर यांचेवर जो मारहाणीचा प्रकार झाला त्याबद्दल प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

सौ.शाहीन जफर : झालेले अतिक्रमण पूर्ण क्लीन करावे, म्हणून मा.न्यायालयाचे आदेश होते कार्यवाहीस वेळ लागला संबंधिताने मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश आणले, पून्हा कॅव्हेट दाखल केले, पून्हा स्टे उठविला. ज्यावेळी मा.न्यायालयाचे आदेश होतात, त्याचवेळी तात्काळ कार्यवाही का होत नाही. या बाबत स्थायी समिती मध्ये खूप चर्चा झालेली आहे. स्थायी समितीची सभा एक तास थांबवून मला पाठविले. मारहाण झाली, काय कार्यवाही केली. प्रशासकीय अधिकारी,विधी सल्लागार यांना बोलावून विचारावे काय कार्यवाही झाली. मी स्थायी समितीच्या सभेत बोलून बोलून थकले. त्यामूळे येथे बोलत आहे. यावर कोर्ट कमिशन नियुक्त केले असे सांगितले, केंव्हा कार्यवाही होणार आहे. अनाधिकृत बांधकाम चालू आहे, का कार्यवाही होत नाही. का तोडण्यात येत नाही. मा.उच्च न्यायालयाचे आदेश होते, पूर्ण क्लीन करावे,का केले नाही. संबंधितास वेळ दिला जातो, तो कोर्टात जातो स्थगिता आदेश आणतो. काम बंद होते, ६-८ महिन्या पासून हा प्रश्न मी मांडते आहे. या प्रकरणावरून मला मारहाण झाली, प्रशासनाने काय कार्यवाही केली.

विधी सल्लागार : २-३ प्रकरणात महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय झालेला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर प्रशासकीय अधिकारी यांनी कार्यवाही प्रस्तावित केली होती. पून्हा प्रकरण न्यायप्रविष्ट झाले. ती खाजगी जागा आहे. खाजगी जागेचा वाद आहे, महापालिका खुली जागा किंवा सरकारी नाही. कोर्ट कमिशन यांनी पाहणी केली. त्यांनी अहवाल दाखल केला. त्यावर युक्तीवाद होऊन निर्णयासाठी राखीव आहे. २० तारखेला निर्णय होईल, त्यानंतर कार्यवाही करणे योग्य होईल.

सौ.निखत परविन : जो गुन्हा दाखल करण्यात आला होता, त्या बाबतीत काय कार्यवाही केली.

उपआयुक्त : आताच काही वेळापूर्वी स.सदस्य श्री.जावेद कुरैशी यांनी जो प्रश्न उपस्थित केला, त्याचा अहवाल श्री.वरदे यांनी दिलेला आहे. त्या अहवाला नूसार जे काही निष्कर्ष होते ते प्रशासनाने स.सदस्य यांना १३ तारखेलाच पाठविले आहे. १४ तारखेला प्राप्त झाले. जे निष्कर्ष आहे ते वाचून दाखवतो.

श्री.मिर हिदायत अली : नागरी संयुक्त समितीत स.सदस्य आहेत त्यांचा नावानिशी उल्लेख केलेला, वृत्तपत्रात आलेले आहे, त्याचा खूलासा होणे आवश्यक आहे.

श्री.स.अली सलामी : दै.लोकमत बातमी छापून आलेली असून महापालिका जागेवर अधिकाऱ्याच्या संगनमताने अतिक्रमण दै.लोकमत दि.१९.०१.०५ अन्वये नगरसेवकांना आवाहन नागरी समन्वय समिती टिळकनगर [illegible]ाद महापालि[illegible] करून मोठी इमारत बांधण्यात येत असून यात महापालिका अधिकाऱ्याचे संगनमत असून स.सदस्या सौ.साधना सुरडकर यांचे वार्डातील हा प्रकार पाहून तेथील नागरीक हैराण झाले आहे. आजच्या दै.लोकमत मध्ये ही बातमी आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : पूर्ण संवाद वाचण्याची गरज नाही. खूप वेळची चर्चा चालू आहे. नको त्या विषयाला चर्चा करण्याची वेळ पूढे आली. या बाबत खूलासा करू इच्छितो की,दै.लोकमत मध्ये जी बातमी आली, ती अत्यंत चूकीची असून स.सदस्या सौ.साधना सुरडकर यांचा तो वार्डच नाही. मुळातच स.नगरसेवकांना माहिती नसतांना चूकीची बातमी छापून आदेशाचे पालन करून नोकरी चाकरी करायची म्हणून चुकीच्या बातम्या चुकीच्या व्यक्तीच्या नावाने छापणे अत्यंत चूकीचे आहे. हे ठामपणे सांगतो सौ.साधना सुरडकर यांचा तो वार्डच नसून बाजूच्या वार्डात ते बांधकाम होत असेल ही बाब त्यांचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संबंधीत कामा विषयी मा.महापौर,मा.आयुक्त यांना कळविले. हा मंजूर ले-आऊट आहे किंवा कसे असे नमूद केलेले होते.माझ्यामते नागरीकांचे मत सोसायटीच्या सदस्याचे मत व तेथील लोकांचे मत जाणून घेतले व ही जागा निश्चितपणे महापालिकेची आहे असे जाणून घेतले व चौकशी करावी व जो पर्यंत चौकशी होत नाही तो पर्यंत त्या कामास स्थगिती द्यावी असे निवेदन त्यांनी दिलेले होते. बातमी द्यायची म्हणून दिली,सौ.साधना सुरडकर यांचा तो वार्डच नाही. चूकीचे नांव छापले सभागृहातर्फे निषेध करावयास पाहीजे.

श्री.मिर हिदायत अली : जे काम केले, व चालू आहे ते कोणाच्या जागेवर आहे. अतिक्रमण होत आहे का. स.सदस्या सुरडकर यांचा तो वार्ड नसेल हे ठिक आहे.

श्री.स.अली सलामी : अतिक्रमण झाले की नाही व बेकायदेशीर बांधकाम होते किंवा काय याचा फक्त खूलासा द्यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : भाजपच्या त्या कार्यकर्त्या असून नगरसेविका आहे. त्यांचा तो वार्डच येत नाही. चूकीची बातमी देणे, बरोबर नाही महापालिकेची बदनामी होत आहे.

श्री.स.अली सलामी : सिटी सर्वे नंबर १५८४९ मध्ये ही मिळकत महापालिकेची आहे का? व असेल तर परवानगी दिलेली आहे का? खूलासा अपेक्षित आहे. बातमीत चूकीने नांव छापले असेल त्यासी सहमत आहोत ज्यांनी बातमी छापली त्यांचेवर काय कार्यवाही करायचे ते भाजपाने करावे.

(सभागृहात स.सभासद मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री.मिर हिदायत अली : महापालिकेच्या खूल्या जागेवर इमारत होते आहे. अनधिकृत बांधकाम आहे का. फक्त एवढाच खूलासा अपेक्षित आहे. आजही बन्सीलालनगर भागात बांधकाम चालू आहे ते थांबवू शकलो का.

श्री.काशिनाथ कोकाटे : प्रशासनाने कायदेशीर कार्यवाही करावी.

श्री.भागवत कराड : विरोधी पक्षनेता व श्री.सलामी यांनी मुद्दा उपस्थित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन आजच्या दै.लोकमत मध्ये जी बातमी आली व जे बांधकाम चालू आहे, तो भाग स.सदस्या सौ.सुरडकर यांच्या वार्डात येत नाही. चूकीने नांव छापले, या बांधकामास माझ्या माहितीप्रमाणे शासनाने परवानगी दिली महानगरपालिकेचे अंकुश का नाही. नगर रचना विभाग, प्रशासकीय विभाग काय काम पाहते,हे स्पष्ट होते. आपण आदेश करावे की, आजच्या आज बांधकाम बंद करावे. ती महापालिकेची मोक्याची जागा आहे. शासनाने परवानगी दिली. शासनाला पत्र द्या की, अशी बांधकाम परवानगी देवू [illegible]ांचा निषेध [illegible] उपमहापौर म्हणून काही नागरीकांनी त्यांची भेट घेतली. त्यामूळे त्यांचे लेटर पॅडवर पत्र दिले. या अगोदर महानगरपालिकेतर्फे कार्यवाही झाली नाही. वृत्तपत्रात खूलासा करावा. काम ताबडतोब बंद करावे,तोडले पाहीजे.खूलासा व्हावा. आदेश द्यावे.

श्री.मिर हिदायत अली : खूलासा घ्यावा, सदरचे बांधकाम त्वरीत थांबविले पाहीजे तसे आपण आदेश करावे.

सहाय्यक संचालक न.र. : सदरची जागा सि.स.क्र.१५८४९/अ ३६६७ चौ.मीटर जागा आहे. ह्या जागेचे रेखाकंना महापालिकेकडून मंजूर झालेले आहे. २१ ऑक्टोबर १९८५ ला मंजूर झालेल्या त्या रेखाकंनातील ही खूली जागा आहे. या खूल्या जागेवर बांधकाम परवानगी नाकारलेली होती. त्यांचे बेटरमेंट चार्जेस भरणा केलेले आहे. एन-ए केले आहे. ओपन प्लॉट टॅक्स भरणा केलेला आहे. बांधकाम परवानगीसाठी नाकारल्या नंतर त्यांनी शासनाकडे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४७ अन्वये अपील केले होते. त्यानूसार शासनाने १७ ऑगस्ट २००४ रोजी असा आदेश दिला. तो खालील प्रमाणे **(वाचून दाखवितात)** प्रस्तुत प्रकरणी अपील कर्त्यास त्याच्या मालकीच्या क्षेत्रावर बांधकाम परवानगी देण्याची कार्यवाही विकास नियंत्रण नियमावली नुसार नियमाचे पालन करून करावी. असा आदेश शासनाने दिलेला आहे परंतू २२ जून २००४ रोजी या जागेवर बांधकाम परवानगी देता येणार नाही. संबंधीताचे अपील फेटाळण्यात यावे. असा अहवाल सूध्दा शासनास दिला होता. अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस सूध्दा सांगितले होते की, अपील फेटाळावे बांधकाम परवानगी देण्यात येऊ नये.

श्री.स.अली सलामी : शासनाने परवानगी कशी दिली जागा महापालिकेच्या मालकीची आहे. महापालिकेची जागा आहे असे शासनास कळवावयास पाहीजे होते.

मा.आयुक्त : शासनाचे आदेश आहे. कलम ४७ अपिलावर सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री.भागवत कराड : शासन मंजूरी देते, महापालिकेस कळविते. परवानगी दिली. एखादा व्यक्ती मालकी म्हणून शासन परवानगी आणत असेल ते पत्र चूकीचे आहे. यासाठी या सभागृहाने एक मताने ठराव पास करावा. शासनाच्या या निर्णयास विरोध करून मा.उच्य न्यायालयात जावे. तसा ठराव घेऊ तूर्त बांधकाम थांबवावे. बांधलेले पाडण्यात यावे तसे आदेश करावे.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : अशा किती ठिकाणी जागा महापालिकेच्या मालकीच्या आहेत. अनेक जागांचे पी.आर.कार्ड नाहीत. या जागेचे पी.आर.कार्ड महापालिकेच्या नावाने होते का?

यापूर्वी सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली व आयुक्तांनी अशा जागे बाबत मालमत्ता अधिकारी यांना यादी सादर करण्याच्या सूचना सभागृहात दिलेल्या होत्या. त्या जागेचा आराखडा तयार झाला असेल तर सभागृहा समोर ठेवावा.

मा.आयुक्त : स्थायी समितीला माहिती दिली आहे. बुकलेट तयार केलेले आहे, एक प्रत तुर्त स.सदस्य श्री.तांदुळवाडीकर यांना देण्यात यावी. कलम ४७ चे अधिकार शासनाचे

आहे. महापालिकेची बाजू मांडलेली आहे. समक्ष अधिकारी हजर राहीलेले आहे. आयुक्त म्हणून मला ही काही मर्यादा आहेत, शासनाचे अधिकार हे निश्चित माझ्यावरचे आहेत. सभागृहाच्या वरचे आहे, असे माझे मत आहे. या सभागृहाला चॅलेज करायचे असेल तर तसा निर्णय घ्यावा निश्चितपणे प्रकरण उच्च न्यायालयात दाखल करता येईल.

विषय क्र. ५२४/१ :

दिनांक २०.११.२००४, दिनांक २०.१२.२ २३ दिनांक ०४.० इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५ झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री.काशिनाथ कोकाटे : दिनांक २०.११.२००४ रोजीच्या सभेतील पान क्र.७ वर महापालिकेत मुख्यध्यापकांची पदे भरण्याच्या पात्रतेसंबंधी प्रस्ताव आहेत क्राफ्ट टीचर म्हणून ६ महिन्याचा कोर्स आहे, पदवी होत नाही. शिक्षण क्षमता राहणार नाही. ज्यांचेकडे पदवी प्रमाणपत्र आहे, बी.एड्,बी.पी.एड्. यांचा जेष्ठते प्रमाणे विचार करा, अशी दुरूस्ती करावी.

मा.महापौर : विषय क्र.१ हा दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

ठराव :

दिनांक २०.११.२००४ ठराव क्र.४७१/४ पान क्र.७ वर ज्यांचेकडे पदवी प्रमाणपत्र आहे, बी.एड्,बी.पी.एड्. यांचा जेष्ठते प्रमाणे विचार करणे अशा दुरूस्ती सह दिनांक २०.११.२००४, दिनांक २०.१२.२००४ व दिनांक ०४.०१.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

विषय क्र. ५२५/२ :

उपआयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विभागीय आयुक्त,कार्यालय, औरंगाबाद यांचे आदेश जा.क्र.२००३/मशाका-१/अस्था रा-१/प्र.क्र.१५१ दि.०४.०२.२००४ च्या आदेशान्वये श्री.के.के.फड यांची कर निर्धारक व संकलक या पदावर औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये प्रतिनियुक्तीने नेमणूक करून त्यांच्या सेवा नगर विकास विभागाकडे सुपूर्द करण्यात येत असल्या बाबतचे निर्देश असल्याने संबंधीतांना महानगरपालिकेच्या सेवेत दि.०४.०२.२००४ पासून रूजू करून घेण्यात आले आहे.

करिता, श्री.के.के.फड, कर निर्धारक व सकंलक यांना महानगरपालिकेत कर मुल्य निर्धारक या पदावर दि.०४.०२.२००४ पासून रूजू करून घेण्या बाबत व त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा नियम, (स्वियोत्तर सेवा) १९८१ च्या कलम ४० मधील परिशिष्ठ २ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून प्रथम एक वर्षाच्या कालावधीसाठी ठरविण्या करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यात येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.के.के.फड, कर निर्धारक व सकंलक यांना महानगरपालिकेत कर मुल्य निर्धारक या पदावर दि.०४.०२.२००४ पासून रूजू करून घेण्या बाबत व त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा नियम, (स्वियोत्तर सेवा) १९८१ च्या कलम ४० मधील परिशिष्ठ २ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून प्रथम एक वर्षाच्या प्रति नियुक्तीच्या कालावधीस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५२६/३ :

श्री.व्ही.एम.जोगदंड,नायब तहसीलदार जालना, ह्यांची विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्र.२००४/म.शा.का./अस्था-रा/प्र.क्र.२४/१ दि.२३.०६.२००४ च्या आदेशान्वये महानगरपालिकेत विभागीय अधिकारी ह्या पदावर प्रतिनियुक्तीने बदलीसाठी विहीत अटी व शर्तीच्या आधीन राहून पदस्थापना करण्यात आली आहे. त्यानूसार श्री.जोगदंड ह्यांना दि.०६.०७.२००४ पासून रूजू करून घेण्यात आले आहे.

करिता श्री.व्ही.एम.जोगदंड,नायब तहसीलदार,ह्यांना दि.०६.०७.२००४ पासून सोबतच्या अटी/शर्तीनुसार एका वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने महानगरपालिकेच्या अस्थापनेवर रूजू करून घेण्यासाठी व प्रतिनियुक्तीच्या कालावधीस मान्यता देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

२४

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

संवाद :

श्री.स.अली सलामी : श्री.जोगदंड नावाचे अधिकारी नायब तहसिलदार, येथे झोन अधिकारी म्हणून येत आहे. झोन अधिकारी हे तहसिलदार दर्जामध्ये येतात. तहसिलदार हे सक्षम अधिकारी असतात. इतर शासनाचे अधिकारी मागविण्याची का आवश्यकता आहे. महापालिकेकडे सक्षम अधिकारी असेल तर त्यांना ही पदे देण्यांत यावी.

श्री.नंदकुमार घोडेले : नायब तहसिलदार व झोन अधिकारी यांचे वेतन श्रेणीत फरक आहे. झोन अधिकारी यांची वेतनश्रेणी तहसिलदार यांचे पदाच्या मध्ये येते. त्यानूसार याबाबत स्थायी समिती मध्ये सुध्दा चर्चा झालेली होती व तहसिलदार दर्जाचे अधिकारी शासनाकडून मागवावे असे आदेश करण्यात आले होते, परंतू शासनाने नायब तहसिलदार पाठविले. तहसिलदार दर्जाचे अधिकारी असावे, अशी मागणी करावी. नायब तहसिलदार यांची वेतनश्रेणी कार्यालयीन अधिक्षक यांचे प्रमाणे आहे. पदोन्नती द्यावी. महापालिकेतील कर्मचारी घ्यावे.

श्री.स.अली सलामी : नायब तहसिलदार घेण्याची गरज काय?

उपआयुक्त (प्र.) : मागील सर्वसाधारण सभेच्या निर्णयानूसार शासनाकडे प्रशासनातर्फे हीच विनंती करण्यात आलेली होती की, तहसिलदार संवर्गातील अधिकारी देण्यात यावे. महापालिकेचे विभागीय अधिकारी हे तहसिलदारच्या वेतनश्रेणीत आहे. तहसिलदार संवर्गातील अधिकारी उपलब्ध नसल्यामूळे नायब तहसिलदार संवर्गातील दोन अधिकारी महापालिकेकडे पाठविले आहेत. त्यांचेकडे अतिरिक्त कार्यभार दिला आहे ते काम करीत आहे. दूसरी बाब अशी की, या पदावर पदोन्नती देण्यासाठी कार्यालयीन अधिक्षक पदावर कर्मचारी कोणीच उपलब्ध नाहीत. म्हणून तात्पुरता कार्यभार दिलेला आहे. पून्हा शासनाकडे तहसिलदार दर्जाचे अधिकारी मागणी करून विनंती करण्यांत येईल.

श्री.स.अली सलामी : तहसिलदार दर्जाचे अधिकारी मागवावे. यांना घेण्यात येऊ नये.

श्री.जगदीश सिध्द : विषय क्र.२ च्या संदर्भात बोलतो आहे.श्री.फड यांना मुदतवाढ देऊ नये. त्यांना त्यांचे विभागास परत पाठवावे. निवडणूक आयुक्त यांनी त्यांचेवर ताशेरे ओढलेले आहे. ते चांगले काम करीत नाही, मुदतवाढ देऊ नये.

श्री.सुनिल मगरे : स.सदस्य श्री.सिध्द यांनी जो मुद्दा उपस्थित केला, तो अत्यंत बरोबर आहे. वार्डाचे पूनर्रचना करीत असतांना मोठमोठे असे घोटाळे केलेले आहे. त्यांचे संदर्भात वृत्तपत्रात वेगवेगळ्या अशा बातम्या सुध्दा छापून आलेल्या आहेत. निवडणूक आयुक्त येथे आले होते, त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून त्यांनी सुध्दा हे मान्य केलेले आहे. वार्डाची पुनर्रचना करतांना विशेष असा दृष्टीकोन समोर ठेऊन रचना केलेली आहे. त्यांनी सुध्दा त्यांचेवर कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. म्हणून अशा अधिकाऱ्यांना परत त्यांचे विभागामध्ये पाठवावे. तसा निर्णय घ्यावा.

श्री.भगवान घडमोडे : एकदा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर त्यावर चर्चा होते, पोरखेळ नाही. जेंव्हा विषय चालू असतो तेंव्हा चर्चा होत नाही पूढील विषय झाल्यानंतर पून्हा मागे येतो हे सभागृहाचे कामकाजाची पध्दत नाही. तशी चर्चा व्हायला नको आहे. यापूर्वीच चर्चा सुरू होण्यापूर्वी चांगली शिस्त असावी. चर्चा होऊ द्यावी,असे स.सदस्य यांनी म्हटले, बेशिस्त होऊ नये.

श्री.सुनिल मगरे : मा.निवडणूक आयुक्त यांनी श्री.फड साहेब यांचेवर ताशेरे ओढलेले आहे. अनुसूचित जातीच्या प्रभागाचे ती[illegible] भाग केले. ख[illegible] आले. त्यांना पाठीशी घालु नये. कार्यवाही झाली पाहीजे.

२५

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

श्री.नंदकुमार घोडेले : विषय क्र.३ व ४ हे मंजूर करून संबंधित अधिकारी यांना ३१ मार्च २००५ पर्यंत ठेवावे,अशी मान्यता देण्यात यावी.

(याचवेळी बरेच स.सदस्य मा.महापौर यांचे डायस समोर जाऊन मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री.भगवान घडमोडे : विषय क्र.२ मंजूर केलेला असून त्यावर चर्चा करणे बरोबर नाही.

श्री.जगदीश सिध्द : पुरवणी विषय क्र.१ या ठिकाणी अगोदरच प्रस्ताव झालेला आहे. रद्द करण्यांत यावा.

मा.महापौर : विषय क्र.३ व ४ च्या संदर्भात ३१ मार्च २००५ पर्यंत त्या अधिकाऱ्यांना रूजू करून घ्यावे.

श्री.मिर हिदायत अली : विषय क्र.५ ते ११ स्थगित ठेवावे बाकी मंजूर करावे.

श्री.रतनकुमार पंडागळे : आताच चर्चा झाली झोन अधिकारी पदावर सक्षम अधिकारी असावे. मुख्य लेखापरिक्षक पदासाठी सक्षम अधिकारी असतांना सुध्दा नियुक्ती दिली जात नाही.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनूसार श्री.व्ही.एम.जोगदंड,नायब तहसीलदार, ह्यांना दि.०६.०७.२००४ पासून अटी/शर्तीनुसार दिनांक ३१ मार्च २००५ पर्यंतच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने महानगरपालिकेच्या अस्थापनेवर रूजू करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५२७/४ :

श्री.एच.एम.राठोड,नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,सोनपेठ,जि.परभणी ह्यांची विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्र.२००४/म.शा.का./अस्था-रा/प्र.क्र.दि.२४.०६.२००४ च्या आदेशान्वये महानगरपालिकेत विभागीय अधिकारी ह्या पदावर प्रतिनियुक्तीने बदलीसाठी विहीत अटी व

शर्तीच्या आधीन राहून पदस्थापना करण्यात आली आहे. त्यानूसार श्री.राठोड ह्यांना दि.०५.०७.२००४ पासून रूजू करून घेण्यात आले आहे.

करिता श्री.एच.एम.राठोड,नायब तहसीलदार, ह्यांना दि.०५.०७.२००४ पासून सोबतच्या अटी/ शर्तीनुसार एका वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने महानगरपालिकेच्या अस्थापनेवर रूजू करून घेण्यासाठी व प्रतिनियुक्तीच्या कालावधीस मान्यता देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनूसार श्री.एच.एम.राठोड,नायब तहसीलदार, ह्यांना दि.०५.०७.२००४ पासून अटी/शर्तीनुसार दिनांक ३१ मार्च २००५ पर्यंतच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने महानगरपालिकेच्या अस्थापनेवर रूजू करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषेश समित्यांकडील प्रस्ताव

(१) वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती कडील प्रस्ताव

विषय क्र. ५२८/५ :

दिनांक २९.१२.२००४ रोजी संपन्न झालेल्या वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीने ठराव क्र.२ अन्वये घन कचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २ [illegible] कृती आराखड्याचे [illegible] देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. प्रस्तावित प्रस्ताव पूढील प्रमाणे आहे. (सोबत घन कचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० नुसार सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या कृती आराखड्याचे सूक्ष्म नियोजनाची प्रत जोडली आहे.)

२६

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा व्यवस्थापन कक्ष डिसेबंर २००३ रोजी स्थापन झालेला आहे, त्याच्या प्रमुखपदी डॉ.जे.जे.कुलकर्णी यांची नियुक्ती झालेली आहे. त्या विभाग क्र.१ ते ६ झोनची स्वच्छतेच्या कामाची पाहणी पूर्ण झालेली आहे. मा.सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या कृती आराखड्याचे सुक्ष्म नियोजनामध्ये काही बदल सुचवलेले आहे. तसेच कल्याण डोंबिवली व पुणे महानगरपालिकेच्या अभ्यास दौरा पुर्ण झालेला आहे. या सर्वांचा अभ्यास करून घनकचरा व्यवस्थापन कक्षाने औरंगाबाद महापालिकेची स्वच्छतेची सर्व स्थिती सुधारण्यासाठी काही बदल सुचविलेले आहे तरी वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीने या प्रस्तावास मंजुरी द्यावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा व्यवस्थापन कक्ष डिसेबंर २००३ रोजी स्थापन झालेला आहे, घनकचरा व्यवस्थापन कक्षाने औरंगाबाद महापालिकेची स्वच्छतेची सर्व स्थिती सुधारण्यासाठी प्रस्तुत प्रस्तावा सोबत जोडलेल्या कृती आराखड्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५२९/६ :

प्रशासनातर्फे वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीसमोर मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या खालील प्रस्तावा बाबत दिनांक २९.१२.२००४ च्या सभेने ठराव क्र.४ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण प्रकरण ६ मधील कलम ६३ (२) (३), अधिनियमाचे कलम १ (ब) आणि नागरी घनकचरा व्यवस्थापन नियम २००० चे अधिन राहून नागरीकांचा सहभाग वाढावा या हेतूने अधिनियमाचे कलम ४५८ च्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या औरंगाबाद महापालिका घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन यासाठी तयार करण्यात आलेल्या उपविधीस मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. त्यानूसार प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या प्रकरण ६ मधील कलम

६३,(२) (३), प्रकरणा मधील तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील घनकचरा व्यवस्थापनाची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेची आहे. तसेच उपरोक्त अधिनियमाच्या मधील कलम १(ब) नूसार पर्यावरणाच्या संरक्षणाची जबाबदारी ही औरंगाबाद महानगरपालिकेची आहे. तसेच नागरी घनकचरा व्यवस्थापन नियम, २००० यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी महानगरपालिकेकडे आल्यामुळे या सर्व तरतुदीचे अधिक स्पष्टीकरण देणारे नियम तयार होणे हे महानगरपालिकेच्या अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीने व नागरीकांच्या दृष्टीने आवश्यक होते. जेणे करून संबंधित अधिकाऱ्यांना व नागरीकांनाही आपल्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत हे स्पष्ट होईल तसेच या जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केल्यास काय शास्ती होईल,हे ही समजेल. तसेच जबाबदाऱ्यांचे विकेंद्रीकरण करून नागरीकांचा सहभाग ही वाढावा या सर्व हेतूने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५८ च्या तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन व साफ़सफ़ाई नियोजन यासाठी हे उपविधी तयार केले आहेत.

१ नामाभिधान, व्याप्ती व प्रारंभ :

अ) हे उपविधी औरंगाबाद महानगरपालिका (घनकचरा व्यवस्थापन व साफ़सफ़ाई नियोजन) उपविधी , २००४ या नावाने संबोधिण्यात येतील.

ब) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व क्षेत्रासाठी व औरंगाबाद शहराबाहेरील परंतू महानगरपालिकेच्या ताब्यातील सर्व क्षेत्रासाठी ते लागू असतील.

क) हे उपविधी राज्य शासनाच्या मान्यतेनंतर अंतिमरित्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून अंमलात येतील.

२) व्याख्या :–

१) संदर्भात अथवा अर्थात काही प्रतिकूल नसल्यास या उपविधीत,

अ) ''अधिनियम ''म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ,१९४९

आ) ''महापौर''म्हणजे अधिनियमाच्या कलम १९ अन्वये निवड करण्यात आलेले महानगरपालिकेचे महापौर

इ) ''उप महापौर'' म्हणजे अधिनियमाच्या कलम १९ अन्वये निवड करण्यात आलेले महानगरपालिकेचे उप महापौर.

ई) ''सार्वजनिक उपद्रव''म्हणजे या उपविधीच्या तरतुदीनुसार विहित केलेल्या पध्दतीने जाणूनबुजून व अजाणता पालन न करण्याचे झालेले कोणतेही कृत्य.

उ ''प्रशासकीय आकार'' म्हणजे या उपविधीच्या तरतुदीचे कोणत्याही व्यक्तीने पालन न केल्यामुळे त्याच्या निवारणार्थ महानगरपालिकेला कराव्या लागणाऱ्या कामासाठी येणारा खर्च.

ऊ ''आयुक्त'' म्हणजे अधिनियमाच्या कलम ३६ च्या तरतुदीनूसार वेळोवेळी शासनाकडून नेमणूक केलेली व्यक्ती.

इ घनकचरा या संज्ञेत धूळ , राख, विटांचे तुकडे , चुना , काचेचेतुकडे, बागेतील किंवा तबेल्यातील केरकचरा व दुर्गंधीयुक्त पदार्थ किंवा मलजल नसलेला कोणात्याही पृकारचा केरकचरा, यांचा समावेश होतो. तसेच अधिनियमाच्या कलम २(२१) मधील घाणीचाही समावेश असेल.

उ घनकचरा व्यवस्थापन , घनकचरा व्यवस्थापनामध्ये

-- कचरा निर्मितीच्या जवळच्या ठिकाणी त्याची साठवणूक व वाहतूक

-- घनकचरा संकलन, वर्गीकरण व त्यावरील प्रक्रिया.

-- रस्ते सफ़ाई व

-- घनकचऱ्याची विल्हेवाट

-- नागरी घनकचरा व्यवस्थापन नियम,२००० मधील विहित केलेल्या सर्व कर्तव्यांचा .

-- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नमूद केलेल्या सर्व कर्तव्यांचा समावेश असेल.

ऊ) ''ओला कचरा'' अथवा ''जैविक विघटन'' होवू शकणारा कचरा म्हणजे सुक्ष्मजीवांद्वारे ज्या पदार्थांचे विघटन होवून सेंद्रीय खताची निर्मिती होवू शकते व यात फ़ळे, भाजीपाला, पालापाचोळा, मांस, मासे, यांचा खाण्यात वापर करण्यासाठी उपयोगी भाग अलग केल्यावर उरलेला निरूपयोग भाग किवा शिळे अन्न इत्यादींचा समावेश असेल. परंतू अशा प्रकारे विघटीत होवू शकणाऱ्या केवळ पाण्याच्या अस्तित्वामुळे ओल्या झालेल्या कचऱ्याचा यात समावेश असणार नाही.

ए) ''पालापाचोळा'' या शब्दात झाडाच्या छाटलेल्या फ़ांद्या, सुकलेली पाने, गवत, यांचा समावेश असेल.

ओ) ''धोकादायक (Hazardous) कचरा''किंवा उपशिष्ट याचा अर्थ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ (१९८६ चा २९) च्या कलम ६,८, व २५ च्या तरतुदीनूसार केंद्र शासनाने केलेल्या धोकादायक उपशिष्टे (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९८९ च्या नियम ३(आय) मध्ये विहित केल्याप्रमाणे असेल व यात खालील घरगुती (धोकादायक) कचऱ्याचा समावेश असेल.

टॉर्चमध्ये वापरून झालेल्या बॅटरी , स्वयंपाक घर वा स्वच्छतागृहात वापरली जाणारी रसायने, पावडरी वगैरे मोटार गाडयांच्या बॅटरी, ऑईल, फ़िल्टर, वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी वापरले जाणारे पदार्थ , रसायने व विद्रावक पदार्थ व त्यांच्या साठवणूकीसाठी वापरलेली पात्रे, रासायनिक पदार्थांचा वापर असलेली प्रसाधने, जंतुनाशके व त्यांची रिकामी पात्रे, विजेचे दिवे, टयुब लाईट वा तत्सम वस्तू, औषधे (मुदतबाहय औषधांसह) रंग, तेल, वंगणे, डिंक वा त्या वस्तू ठेवलेली रिकामी पात्रे छायाचित्रे तयार करण्यासाठी वापरली जाणारी रसायने, फ़ोम पॅकेजींग, थरमामिटर किंवा पारा वापरलेली अन्य उपकरणे.

औ) ''जैविक कचरा'' म्हणजे मनुष्यप्राण्याच्या / जनावरांच्या / पक्षांच्या रोगाची चिकित्सा, औषोधोपचार वा प्रतिबंधात्मक उपाययोजना वा यासंबंधाती चाचणीसाठी केलेल्या कारवाईत निर्माण झालेले / वापरलेले टाकाऊ पदार्थ.

२८

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

औ) ''सुका कचरा'' म्हणजे जैविक विघटन होवू शकणारा कचरा, पालापाचेळा, धोकादायक वा जैविक कचऱ्या व्यतिरिक्त घरातील / धंद्याच्या जागेतील/दुकानाचे जागेतील कचरा, मात्र यात राज्य शासनाने वापरासाठी प्रतिबंध केलेल्या व पुर्ननिर्माणासाठी उपयोगी नसलेल्या प्लॉस्टिकचा समावेश असणार नाही.

अ:) ''पुनरूत्पादनासाठी उपयुक्त कचरा'' म्हणजे ज्याचा वापर करून उपयोगी पदार्थ निर्माण करता येणे शक्य असते. यात कागद , काच, धातू, राज्य शासनाने वापरासाठी प्रतिबंध न केलेले प्लास्टीक वगैरे गोष्टींचा समावेश होतो.

२) या उपविधींत वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा वा शब्दसमूहांचा अर्थ खंड (१) मध्ये समाविष्ट नसेल त्यांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तो असल्याचे समजण्यात येईल.

३) उपविधींची अंमलबजावणी करण्याचे काम सोपवण्यात आलेले महानगरपालिका प्राधिकारी.

१) औरंगाबाद महानगरपालिकेतील या उपविधींच्या तरतुदी अंमलात आपण्याचे काम ज्या महानगरपालिकेच्या प्राधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले आहे ते पूढील प्रमाणे आहे.

अ महापौर / उप महापौर

ब आयुक्त

क आरोग्य वैद्यकिय अधिकारी

२ वरिष्ठ अधिकारी उपविधींच्या कलम (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे नागरी घनकचरा व्यवस्थापनाच्या अंमलबजावणीकरीता जबाबदार असतील.

३ ही जबाबदारी पार पाडण्यासाठी संबंधित प्राधिकाऱ्यांनी घनकचरा व्यवस्थापनाची नियोजनबध्द पध्दत विहित करणे आवश्यक आहे.

४ धुळ कचरा इत्यादी गोळा करणे मालक व भोगवटादाराची जबाबदारी

१ आयुक्तांने सार्वजनिक रस्त्यांच्या साफ़सफ़ाईसाठी केलेल्या तरतुदी वगळता, महापालिका हद्दीतील प्रत्येक जागेचा मालक/ भोगवटादार त्याचे ताब्यातील/ वापरातील (जागा वापरात असली किंवा नसली तरीही) जागेतील केरकचरा गोळा करून या उपविधीच्या तरतुदीनुसार नेमून दिलेल्या पध्दतीने त्याची विल्हेवाट लावण्यास जबाबदारी असेल.

२ कोणत्याही सार्वजनिक जागेवर, धुळ , राख, घनकचरा, धोकादायक कचरा, जैविक कचरा धंद्यातील केरकचरा, ओला कचरा , मलमुत्र किंवा इतर कोणतेही दूषित पदार्थ विसर्जित केलेले किंवा ठेवलेले आढळून आल्यास, तद्विरूध्द सिध्द करण्यात येईपर्यंत, ते अशा जागेशेजारील जागेच्या भोगवटादाराने / मालकाने ठेवले असल्याचे समजण्यात येईल.

५ केर कचरा साठविण्याची व विल्हेवाटीची पध्दत विहित करण्याचा महानगरपालिकेचा अधिकार

१ महानगरपालिका विहित करेल त्या पध्दतीनूसार कचऱ्याचे वर्गीकरण, साठवणूक करण्याची व विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कचरा निर्माण करणाऱ्यावर असेल.

२ अ निरनिराळ्या प्रकारच्या कचऱ्याच्या साठवणूकीची व त्यांच्या विल्हेवाटीचे पध्दत महानगरपालिका विहित करील. या पध्दतींना योग्य ती प्रसिध्दी दिली जाईल.

ब महानगरपालिकेने पोट उपविधी २(अ) प्रमाणे मान्यता दिल्यानंतर सुक्या कचऱ्याची पुर्नवापरासाठी उपयुक्तता लक्षात घेवून त्यांचे आणखी वर्गीकरण करून त्यानूसार त्यांच्या स्वतंत्र साठवणूकीचे व विल्हेवाटीच्या पध्दतीबाबत आदेश देण्यास आयुक्त सक्षम असेल.

३ केरकचऱ्याच्या साठवणूकीच्या वर्गीकरणाच्या व विल्हेवाटीच्या विहित पध्दतीत सूधारणा झाल्याने कोणतीही नवी पध्दत अंमलात आल्याचे आयुक्तांने जाहिर केल्याच्या तारखेपासून केरकचऱ्याची साठवणूक व विल्हेवाट सुधारित पध्दतीने करण्याची जबाबदारी कचरा निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर असेल.

६ प्लास्टीकचा कचऱ्यात समावेश करण्यावर निर्बंध:-

१ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ (१९८६ चा २९) च्या तरतुदीनूसार केलेल्या पर्यावरण (संरक्षण) नियम ४ च्या अधिकारात राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानूसार किमान विहित जाडी असेलेले नवीन प्लास्टीक व पुनचक्रित प्लास्टीकच्या पिशव्यांचे उत्पादन विक्री, आयात व पूरवठयावर बंदी घातलेल्या प्लास्टीकचा कोणत्याही प्रकारच्या कचऱ्यात समावेश करता येणार नाही.

२ वरील तरतुदींचा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग झाल्यास रूपये १००/- या प्रमाणे प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल.

७ केरकचऱ्यांच्या विल्हेवाटीची पध्दत :

१ अ उपविधी ४ च्या तरतुदीनूसार विहित करण्यात आलेल्या पध्दतीप्रमाणे गोळा करण्यात आलेल्या कचऱ्यांचे वर्गीकरण करून साठवणूक करण्याचे व विल्हेवाट लावण्याचे, मालकावर वा भोगवटादारावर बंधन असेल.

ब ज्या व्यक्तींच्या ताब्यातील चतुष्पाद प्राणी जनावर वा पक्षी सार्वजनिक जागी वा रस्त्यावर मलमूत्र विसर्जन करील, त्या व्यक्तीवर ते मलमूत्र काढून घेवून ती जागा/रस्ता स्वच्छ करण्याची जबाबदारी असेल.

क उपविधी ४ प्रमाणे गोळा करण्यात आलेला कचरा, मलमूत्र किंवा कोणतेही दूषित पदार्थ कचराकूंडयात टाकतांना वा कचरा गाडीवर नेवून देताना व वाहतूक करतांना त्याचा कोणताही भाग

रस्त्यावर, नालीत वा दुसऱ्या कोणत्याही जागेत पडता कामा नये. असा सांडलेला कचरा ताबडतोब पूर्णपणे काढून घेवून रस्ता स्वच्छ करण्याची जबाबदारी कचरा सांडणाऱ्या व्यक्तीवर असेल.

ड गोळा करण्यात आलेला कचरा मालक/भोगवटादार/कचरा वाहतूक करणारा कंत्राटदार वा इतर कोणीही व्यक्तीने जाळता कामा नये.

इ महानगरपालिकेने कचरा घरोघरी जावून गोळा करण्याचे विहित केल्यास, घरातील किंवा संस्थेतील कचरा नगरपालिकेचे कर्मचारी अथवा एजन्सीकडे विहित केलेल्या वेळी सुपूर्द करणे जागेच्या मालकावर / भोगवटादारावर बंधनकारक राहील. कचरा जमा करण्यासाठी आयुक्तांने ठिकाणे निश्चित करून निरनिराळया प्रकारच्या कचऱ्यासाठी वेगवगळया रंगाच्या कचराकूंडयाची व्यवस्था केल्यास जागामालक/भोगवटादारांना त्याही कचरा कुंडयात घरगुती , धंद्यातील कचरा टाकण्याची मुभा असेल मात्र त्या कुड्यात कचरा ''ओला व सुका'' किंवा दगड माती टाकण्याची जबाबदारी संबंधीत मालकावर व भोगवटादारावर राहील.

फ़ वरील पोट उपविधी (अ) ते (इ) चा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग झाल्याच्या पहिल्या वेळी रू.१००/- व पुढील प्रत्येकवेळी रूपये २५०/- प्रशासकीय आकार वसूल केला जाईल.

२ (अ)कचऱ्यातून, पुर्नवापरासाठी योग्य असणाऱ्या वस्तू , या बाबतीत आयुक्ताने प्राधिकृत केलेली संस्था/व्यक्ती संकलीत व वेगळया करून त्यांचा स्वत:साठी विनियोग करू शकेल. मात्र, सुक्या कचऱ्यातून अशा वस्तू शोधण्यासाठी कचराकुंडीतील कचरा मोकळया जागेवर बाहेर काढता येणार नाही.

ब वरील (२ -अ) च्या तरतुदीच्या भंग करणाऱ्या व्यक्तीकडून असा भंग झाल्याच्या पहिल्या वेळी रूपये २५/- व पूढील प्रत्येक वेळी रूपये ५०/- प्रशासकीय आकार वसूल केला जाईल.

८ भूखंडाचे विकास काम करतांना कचराकुंडयासाठी राखीव जागा ठेवणे बंधनरकारक

अ) महानगरपालिकेच्या हद्दीतील ५०० चौ.मी. वा त्यापेक्षा अधिक क्षेत्राच्या भूखंडावर विकास काम करतांना योग्य आकाराच्या क्षेत्रफ़ळाची जागा कचरा साठवणूकीसाठी त्या भूखंडाचे क्षेत्रात राखीव ठेवण्याची विकासाची जबाबदारी असेल.

ब) जागेचे भोगवटादार या राखीव जागेत आयुक्ताने विहित केलेल्या संकल्पने नसार तयार केलेल्या किंवा महानगरपालिकेने विहीत के[illegible] किंवा पूरविलेल्या [illegible] जबाबदारी असतील अशा कचराकूंडया वापरण्याची जबाबदारी भोगवटादारांवर असेल.

३० इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

क) या जागेचा दूसऱ्या कोणत्याही कारणासाठी उपयोग झाल्यास अन्य कोणत्याही अधिनियमांच्या / नियमांच्या तरतुदींना बाधा न येता या उपविधींच्या तरतुदीसाठी तो सार्वजनिक उपद्रव समजला जाईल.

ड) या उपविधीतील वरील तरतुदींचा भंग करणाऱ्या मालक/भोगवटादार यांचेकडून पहिल्या वेळी रूपये ५०००/- व त्यानंतरही तो भंग तसाच चालू राहिल्यास पूढील प्रत्येक वेळी रूपये १०,०००/- एवढा प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल.

''रेखांकन मंजूर करीत असतांना रेखांकनामध्ये कचरा साठवणूकीसाठी योग्य ते क्षेत्र राखीव ठेवण्याची जबाबदारी मिळकतधारक, मालक किंवा विकासक यांची राहील''.

९ मोठया प्रमाणावर कचरा निर्माण होणाऱ्या संस्था/शाळा/महाविद्यालये/हॉटेल्स/गोठे/तबेले यांचेकडील कचऱ्याची विल्हेवाट:

कोणत्याही संस्था/हॉटेल्स/वर्कशॉप/गोठे/तबेले/वसतीगृहे/मंगल कार्यालये इत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणावर कचरा निर्माण होतो. त्या जागेच्या भोगवटादारांना मालकांना अधिनियमांच्या कलम १३७ च्या तरतुदीनूसार विशेष दराने साफ़सफ़ाई कर व शूल्क निश्चित केले जाईल. किंवा आयुक्तांने निर्देश दिल्यास कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी आयुक्त यांच्या बरोबर संविदा करणे बंधनकारक असेल.

१० अ) उद्योगधंद्यापासून निर्माण होणारा व धोकादायक नसलेला कचरा आयुक्तांने त्यासाठी ठरवून दिलेल्या जागी स्वखर्चाने वाहतूक करून विहित पध्दतीने जमा करण्याची जबाबदारी उद्योजगांवर राहील.

ब) वरील (१ अ) च्या तरतुदीचा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग झाल्या प्रत्यंक वेळी रूपये ५०००/- प्रशासकीय आकार वसूल केला जाईल.

२ उद्योगधंद्यातून निर्माण होणारी धोकादायक (Hazardous) अपशिष्टे (Wested) गोळा करणे, साठविणे व त्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ खाली करण्यात आलेल्या धोकादायक अपशिष्टे (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९८९ च्या तरतुदीप्रमाणे उद्योगधंद्याच्या जागेचा मालक /भोगवटादारावर राहील.

३ उपरोक्त तरतुदीचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या तरतुदीप्रमाणे कायदेशिर कार्यवाही करण्या व्यतिरिक्त , महापालिका अधिनियमाच्या कलम ३१३,३७६ (अ) अन्वये रू.१०००/- इतका दंड वसूल केला जाईल.

११ खाजगी बाजार व कत्तलखान्यात निर्माण होणारा कचरा

१ अ) अधिनियमाच्या कलम ३७८ च्या तरतुदीनूसार खाजगी बाजार व खाजगी कत्तलखांना उघडण्यास महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीतील अटीनूसार अशा बाजारात / कत्तलखान्यात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी परवानगीधारकांवर असेल.

ब) अशा बाजारात / कत्तलखान्यात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पूरेशी यंत्रणा निर्माण करण्याची जबाबदारी परवानगीधारकावर असेल व या यंत्रणे संबंधीचा तपशील मागणी करताच त्याने आयुक्तांना पूरविणे आवश्यक असेल, आवश्यकतेप्रमाणे आयुक्तांला या यंत्रणेत कोणातही फ़ेरफ़ार सुचविता येईल व त्याप्रमाणे यंत्रणा सिध्द ठेवण्याची जबाबदारी परवानाधारकांवर असेल.

क वर ब प्रमाणे पूरविण्यात आलेल्या तपशिलानूसार यंत्रणा कार्यरत आहे किंवा नाही हे तपासण्याचा आयुक्तांना अधिकार असेल.

ड कचरा उचल्याचे कामातील त्रुटी परवानगीधारकाच्या निदर्शनास आणून दिल्यावर आयुक्तांच्या सूचनेप्रमाणे यंत्रणेत आणखी वाढ करणे आवश्यक असल्यास ४८ तासात तशी सूधारणा करण्याचे परवानगीधारकावर बंधन राहील.

२ वरील तरतुदींचा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून ३१ ग झाल्याच्या प्रत्ये इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५ प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल.

१२ जैविक कचराची विल्हेवाट

१ अ) जैविक कचरा तयार होणाऱ्या प्रत्येक संस्थेचा भोगवाटादार/मालक/मनुष्यप्राण्याच्या आरोग्यावर तसेच पर्यावरणावर कोणताही परिणाम होवू न देता, अशा कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास पूर्णत: जबाबदार असेल.

ब) त्या कचऱ्याची विल्हेवाट लावताना पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ व जैविक कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम , १९९८ च्या तरतुदीचे पालन करणे जागेचा भोगवटादार/मालक यांचेवर कायदेशिर बंधन असेल.

क) वरील (१-अ) मधील संस्था या शब्दात रूग्णालये, नर्सिंग होम्स, औषधालये, दवाखाने , दंतवैद्यकिय दवाखाने, पशुवैद्यकिय संस्था, तबेले, गोठे, पॅथॉलॉजिकल प्रयोगशाळा रक्तपेढया वा अशाच वा इतर कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या संस्थांचा समावेश आहे.

२) वरील तरतुदीचा भंग करणारया व्यक्तींकडून असा भंग झाल्याच्या प्रत्यंक वेळी रूपये १०,०००/- प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल.

१३ घाण पाण्याचे नि:सारण

१ अ) कोणत्याही जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास अधिनियमाच्या कलम १५९ च्या तरतुदीनूसार आयुक्तांच्या लेखी परवानगीने त्याची खाजगी नाली पावसाने पाणी वाहून नेणाऱ्या किंवा घाण पाण्याच्या नि:सारणासाठी तरतुद केलेल्या योग्य त्या नालीत सोडता येईल.

ब) उपविनियम (१-अ) प्रमाणे परवानगी न घेता जोडलेल्या नालीसंबंधी अधिनियमाच्या कलम १८३ अन्वये कारवाई केली जाऊ शकेल.

२) वरील तरतुदींचा भंग करणाऱ्या व्यक्तींकडून असा भंग झाल्याच्या प्रत्येक दिवशी रूपय` १०,०००/- प्रशासकीय आकार वसूल करण्यात येईल,.

१४ मोठया प्रमाणावर गर्दी करणाऱ्या ठिकाणी फ़िरत्या शौचालयांची सुविधा आवश्यक:

१ सार्वजनिक मेळावे, सभा, अधिनवेशने , यात्रा इत्यादी ज्या प्रसंगी मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. त्या ठिकारणी जमीन मालकाने/भोगवटादाराने / त्या समारंभाच्या / प्रसंगाच्या संयोजगाने, फ़िरत्या शौचालयाची व कचरा कूंडयाची सूविधा उपलब्ध करणे बंधनकारक असेल.

२ अशा मेळाव्यासाठी जमणाऱ्या गर्दीच्या प्रमाणाचा अनूभव लक्षात घेवून ही सूविधा खालील प्रमाणात उपलब्ध करून द्यावी लागेल.

स्वच्छता गृहे (१००० व्यक्तींसाठी)		कचराकुंडया (१०,००० व्यक्तींसाठी)
पुरूष	३	
स्त्रीया	३	२ व्यक्तीसाठी ०.२० घ.मी.+ १ घ.मीटर
अपंग	१	

३ आयुक्तांने पुरूष /स्त्रीया / अपंग यांचेसाठी निश्चित करून दिलेल्या प्रमाणात अशी सुविधा उपलब्ध केल्याचे आढळून आल्यास त्यानंतर जी सफ़ाई करावी लागेल त्याचा खर्च संबंधीतांकडून वसूल केला जाईल. तसेच तो सार्वजनिक उपद्रव समजला जाईल व उपविधी क्र.१४ च्या तरतुदीनूसार विहित प्रशासकीय आकार द्यावा लागेल.

१५ कलम २९२ अन्वये नेमून देण्यात न आलेल्या जागेवर केरकचरा/मलमूत्र विसर्जित करणे वगैरे.

अ) मलमूत्र विर्सजन, सार्वजनिक जागेवर थूंकणे वा कोणतेही दूषित पदार्थ, धूळ , राख, केरकचरा, कचरा, धंद्यातील केरकचरा सार्वजनिक जागेवर टाकणे असे कोणतेही कृत्य करताना कोणतीही व्यक्ती आढळल्यास महानगरपालिका अधिनियमातील तरतदी शिवाय अन्य अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कायदेशीर क[illegible] पात्र राहील. अशी [illegible] तरतुदीने उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीचा पालक अशा कायदेशिर कार्यवाहीस पात्र राहील.

३२

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

ब) याशिवाय या उपविधींच्या तरतुदीनूसार ती उपकृती समजण्यात आल्यामुळे उपविधी क्र.१४ च्या तरतुदीनूसार विहित प्रशासकीय आकार द्यावा लागेल.

१६ सार्वजनिक उपद्रव करणे व त्यासाठी देय असणारे प्रशासकीय शुल्क:

अ) सार्वजनिक आरोग्याच्या परिक्षणासाठी अधिनियम , त्याखालील नियम व या उपविधीतील तरतुदींचे तंतोतंत पालन करणे ही प्रत्यंक संबंधीत व्यक्तींची विधीवत जबाबदारी आहे असे असूनही जाणता वा अजाणता त्या तरतुदींचे पालन न झाल्यास त्याचा सार्वजनिक आरोग्यावर होणारा परिणाम विचारात घता ती बाब सार्वजनिक उपद्रव या सदरात मोडते. या तरतुदींच्या उल्लंघनासाठी संबंधीत व्यक्तींवर अधिनियमातील तरतुदीनूसार योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

ब) त्या व्यतिरिक्त सार्वजनिक आरोग्यावर परिणाम होवू न देण्यासाठी या उपविधींच्या अंमलबजावणीची जबाबदारी महानगरपालिकेच्या प्रशासन यंत्रणेवर असलयाने निर्माण केलेला उपद्रव दूर करण्यासाठी या उवविधींच्या तरतुदीत विहित केलेल्या प्रशासकीय आकाराची वसूली अधिनियमाच्या कलम ४३९ च्या तरतुदीनूसार केली जाईल.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ६ मधील कलम ६३ (२) (३), अधिनियमाचे कलम १ (ब) आणि नागरी घनकचरा व्यवस्थापन नियम २००० चे अधिन राहून नागरीकांचा सहभाग वाढावा या हेतूने अधिनियमाचे कलम ४५८ च्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या औरंगाबाद महापालिका घनकचरा व्यवस्थापन व साफसफाई नियोजन यासाठी तयार करण्यात आलेल्या उपविधीस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

(२) शहर सुधार समिती कडील प्रस्ताव

विषय क्र. ५३०/७ :

सर्वसाधारण सभा दिनांक ०५.०८.२००४ ठराव क्र.४१७/५ अन्वये शहर सुधार समितीकडे वर्ग करण्यात आलेल्या खालील प्रस्तावास दिनांक ०३.०१.२००५ च्या शहर सुधार समितीने ठराव क्र.५ अन्वये मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार मौजे नक्षत्रवाडी येथील गट क्र.११३/पै. मिळकतधारक आर पटेल एन्टरप्राईजेस तर्फे पार्टनर श्री.भरत विरजीभाई पटेल यांनी त्यांच्या उक्त मिळकती मधील विकास योजना १५ मीटर रूंद रस्त्या खालील बाधित क्षेत्र व आरक्षण क्र.S1/D ''गार्डन'' या प्रस्तावीत बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दि. १९.६.२००४ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस बजावलेली आहे.

अर्जदाराचे उक्त मिळकतीचे बाधित क्षेत्र अंदाजे खालील प्रमाणे आहे.

प्रस्ताव	बाधित क्षेत्र
१५ मीटर रूंद रस्ता	१९५० चौ.मी.
आरक्षण क्र. S1/D ''गार्डन''	२०८० चौ.मी.

तथापी उपरोक्त आरक्षण खालील विकास योजना अहवाल एकूण बाधित क्षेत्र ३.२० हेक्टर असून मोबदला अंदाजे २.२३ कोटी दर्शविलेला आहे.

अर्जदाराचे वरिल प्रमाणे बाधित क्षेत्र संपादन करून आरक्षणाचा उद्देश सफल होणारा नाही करिता अर्जदाराने दिलेल्या गट क्र.११३/पै. जागेचे ३३ सुचना प्रमाणे इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५ क्र.११४/पै.बाधित सह संपूर्ण आरक्षणा खालील क्षेत्र सपादन करणे योग्य होईल.

तसेच उक्त आरक्षणाचे बाधित क्षेत्रासाठी मिळकतधारकाने वरिल प्रमाणे खरेदी सुचना दि.१९.६.२००४ रोजी दिलेली आहे. खरेदी सुचना दिनांकापासून सहा महिन्याच्या आत म्हणजे दिनांक १८.११.२००४ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचे कडे पाठविणे आवश्यक आहे.

सबब वरिल प्रमाणे खरेदी सुचना नुसार अर्जदाराचे बाधित क्षेत्र, शिवाय संपूर्ण आरक्षणाखालील बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी व भूसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

टिप :- उक्त भूसंपादन प्रस्ताव जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/२८७५/२००४ दि.१०.११.२००४ अन्वये मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार मौजे नक्षत्रवाडी येथील गट क्र.११३/पै. १५ मीटर रूंद रस्त्या खालील बाधित क्षेत्र व आरक्षण क्र.S1/D ''गार्डन'' या आरक्षणाने बाधित १९५० चौ.मी. व २०८० चौ.मी. अनुक्रमे मिळकत संपादन करणेस व भूसंपादन करण्यास लागणाऱ्या खर्चास बहुमताने मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३१/८ :

सर्वसाधारण सभा दिनांक ०५.०८.२००४ ठराव क्र.४१९/७ अन्वये शहर सुधार समितीकडे वर्ग करण्यात आलेल्या खालील प्रस्तावास दि.०३.०१.२००५ च्या शहर सुधार समितीने ठराव क्र.६ अन्वये मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार मौजे इटखेडा येथील गट क्र.८०,८३,६२/३ व ६३ मधील विकास योजना आरक्षण क्र.एच.डी/ऐ विस्थापित्याचे पुनर्वसन,६० मीटर रूंद रस्ता बीड बायपास वळण ते पैठण रोड ६० मी रूंद रस्ता पैठण ते औरंगाबाद तसेच आरक्षण क्र. डी/जे ''तपासणी बंगला '' (इन्सपेक्शन बंगलो) या प्रस्तावाने बाधित क्षेत्रासाठी मिळकत धारक मेसर्स नाथ सिड्स लिमिटेड, मेसर्स आकाश इन्टरप्राईजेस, मेसर्स आशू एन्टरप्राईजेस तर्फे ॲड.विजय गंगातीरे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये सर्व मालकी हक्काच्या कागदपत्रासह दिनांक १६.४.२००४ रोजी महानगरपालिकेस खरेदी सुचना दिलेली आहे. उक्त खरेदी सुचना नुसार भूसंपादन प्रस्ताव कालमर्यादेत म्हणजेच दिनांक १५.१०.२००४ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. नसता आरक्षण व्यापगत होईल.

तथापी ६० मी.रूंद रस्ता बीड बायपास या रस्त्याचा विकास सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडून झालेला आहे. तसेच ६० मी. रूंद रस्ता बीड बायपास वळण ते पैठण रोड या रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे सुरू आहे. तसेच आरक्षण क्र.डी/जे ''तपासणी बंगला '' यासाठी सार्वजनिक बांधकाम खाते औरंगाबाद हे भूसंपादन संस्था असल्याने उक्त आरक्षण संपादन करणेसाठी जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/१३९६/२००४ दिनांक २९.५.२००४ नुसार मा.कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम खाते यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे वरील प्रस्ताव सोडून आरक्षण क्र.एच.डी/ऐ ''विस्थापितांचे पुर्नवसन '' व ६० मीटर रूंद रस्ता पैठण ते औरंगाबाद या रस्त्यासह मिळकती गट क्र. ८०,८१,८२,८३ व ६३ एकूण बाधित क्षेत्र ४.५ हेक्टर (४५२०२ चौ.मी.) जमिन संपादन करणेसाठी त्यासाठी लागणारा भूसंपादन खर्च अंदाजे ५ कोटी अपेक्षित खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

टिप :- उक्त भूसंपादन प्रस्ताव जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/१३९६/०४ दि.२९.०५.२००४ अन्वये जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना वाढीव हद्दी नुसार मौजे इटखेडा येथील आरक्षण क्र.एच.डी/ऐ ''विस्थापितांचे पुर्नवसन '' व ६० मीटर रूंद रस्ता पैठण ते औरंगाबाद या रस्त्यासह मिळकती गट क्र. ८०,८१,८२,८३ व ६३ [illegible] बाधित क्षेत्र ४.५ हेक्[illegible] व भूसंपादन करणेस लागणाऱ्या खर्चास बहुमताने मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३२/९ :

दिनांक ०३.०१.२००५ रोजी संपन्न झालेल्या शहर सुधार समितीने ठराव क्र.७ अन्वये खालील प्रस्तावास मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. प्रस्तावित प्रस्ताव पूढील प्रमाणे आहे.

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास (वाढीव हद्द) नूसार मौजे मुस्तफाबाद सर्व्हे क्रमांक ३/ पैकी व ४/पैकी मुख्य प्रवर्तक गुलमर्ग स.गृ.नि.संस्था यांच्या उक्त मिळकतीमध्ये विकास योजना ६० मीटर रूंद रस्ता बीड बायपास व १२ मीटर रूंद रस्ता प्रस्तावीत आहे. उक्त रस्त्याने बाधित क्षेत्र संपादन करणे साठी अर्जदाराने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिनांक १८.०८.२००४ रोजी महानगरपालिकेस बजावलेली आहे. बीड बायपास विद्यमान ३० मीटर रूंद असून दोन्ही बाजुंनी १५ मीटर रूंद सर्व्हीस रोड आहे. वरील दोन्ही रस्त्याच्या भूसंपादनासाठी समुचित प्राधिकरण औरंगाबाद महानगरपालिका आहे.

करीता अर्जदाराच्या उक्त मिळकती मधील १२ मीटर विकास योजना रस्त्याने अंदाजे १८७२ चौ.मी.क्षेत्र बाधित असून १५ मीटर रूंद रस्त्याने अंदाजे १६३० चौ.मी.क्षेत्र बाधित आहे. त्यामूळे खरेदी

सूचना पत्र दिल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत म्हणजेच दिनांक १७.०२.२००५ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे वर्ग करणे आवश्यक आहे. उक्त बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी अंदाजे मोबदला रूपये ८० लाख (रू.ऐंशी लाख) अपेक्षित आहे.

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना अंमलबजावणी अहवाला नूसार सदर रस्त्याचे भूसंपादनासाठी सन २००६-२००७ वर्ष आहे तथापि प्रकरणांत मिळकतधारकाने खरेदी सूचना दिली असल्याने खरेदी सूचना दिल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत म्हणजेच दिनांक १७.०२.२००५ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे नसता भूसंपादन प्रस्ताव व्यपगत होईल.

सबब खरेदी सूचनेच्या अनुषंगाने उक्त बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी व त्याकरीता भूसंपादनास लागणारे अंदाजे रूपये ऐंशी लाख खर्चास मान्यता देणेस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

टिप :- उक्त भूसंपादन प्रस्ताव जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/३२४६/२००४ दि.२८.१२.२००४ अन्वये मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद शहर मंजूर विकास वाढीव हद्द नूसार मौजे मुस्तफाबाद सर्व्हे क्रमांक ३/ पैकी व ४/पैकी १२ मीटर रूंद रस्ता व १५ मीटर रूंद रस्त्याने बाधीत क्षेत्र १८७२ चौ.मी. व १६३० चौ.मी. अनुक्रमे मिळकत संपादन करणेस व भूसंपादन करण्यास लागणाऱ्या खर्चास बहूमताने मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३३/१० :

दिनांक ०३.०१.२००५ रोजी संपन्न झालेल्या शहर सुधार समितीने ठराव क्र.८ अन्वये खालील प्रस्तावास मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. प्रस्तावित प्रस्ताव पूढील प्रमाणे आहे.

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे हर्सूल येथील सर्व्हे क्रमांक २२८/६ आणि २२८/९ ब ह्या मिळकत औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार आरक्षण क्रमांक १ व २ अनुक्रमे प्राथमिक शाळा व क्रिडांगण या प्रस्तावाने अंशत: बाधित असून बाधित क्षेत्र ४८६१.६२ चौ.मी. आहे.

उक्त बाधित क्षेत्र संपादन करण्यासाठी मिळकत धारक श्री.गंगाराम भाऊसिंग बकले, श्री.सुर्यभान यादव सांगळे व इतर यांच्यातर्फे मुखत्यारआम श्री.सय्यद अहमद अली पिता सय्यद नवाजीश अली यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम१९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिनांक २०.०७.२००४ रोजी महानगरपालिकेस बजावलेली आहे.

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना अंम ३५ ी अहवालानूसार सद इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५ संपादनासाठी सन २००६-२००७ वर्ष दर्शविण्यात आलेले आहे. तथापि मिळकत धारकाने खरेदी सूचना दिलेली असल्याने खरेदी सूचनेच्या अनुषंगाने भूसंपादन प्रस्ताव मुदतीच्या आत म्हणजेच खरेदी सूचना प्राप्त झाल्याच्या तारखे पासून सहा महिन्याच्या आत म्हणजेच दिनांक १९ जानेवारी २००५ पूर्वी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे नसता आरक्षण व्यपगत होऊ शकते.

सबब अर्जदाराच्या वरील खरेदी सूचनाच्या अनुषंगाने भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास्तव व त्यास लागणाऱ्या भूसंपादन खर्च ३० लाख खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

टिप :- उक्त भूसंपादन प्रस्ताव जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/३२४८/२००४ दि.२८.१२.२००४ अन्वये मा.जिल्हाधिकारी यांचकडे पाठविण्यात आलेला आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे हर्सूल येथील सर्व्हे क्रमांक २२८/६ आणि २२८/९ ब ह्या मिळकत औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार आरक्षण क्रमांक १ व २ अनुक्रमे प्राथमिक शाळा व क्रिडांगण बाधित क्षेत्र ४८६१.६२ चौ.मी. च्या संपादनास व भूसंपादन करणेस लागणाऱ्या खर्चास बहुमताने मंजूरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३४/११ :

दिनांक ०३.०१.२००५ रोजी संपन्न झालेल्या शहर सुधार समितीने ठराव क्र.९ अन्वये खालील प्रस्तावास मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. प्रस्तावित प्रस्ताव पूढील प्रमाणे आहे.

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नूसार २४ मीटर रूंद रस्ता सर्व्हे क्रमांक ७१३/ पैकी मौजे चिकलठाणा मध्ये प्रस्तावीत असून उक्त मिळकतीचे मिळकत धारक मेसर्स बालाजी बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स लि.नांदेड एकूण भागीदार १२/तर्फे व स्वत: श्री.पंजाबराव श्रीहरी वडजे यांनी उक्त मिळकती मधील २४ मीटर रूंद विकास योजना रस्त्या खालील बाधित क्षेत्र संपादन करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिनांक ०१.१२.२००४ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस बजावलेली आहे.

उक्त खरेदी सूचनेच्या अनुषंगाने भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे खरेदी सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून सहा (६) महिन्याच्या आत म्हणजेच दिनांक ३१.०५.२००५ पूर्वी पाठविणे आवश्यक आहे. नसता विकास योजना आरक्षण / रस्ता व्यपगत होते त्यामूळे कालमर्यादा लक्षात घेता प्रकरणांत उक्त भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यासाठी मान्यता आवश्यक आहे.

तसेच अर्जदाराची सर्व्हे क्रमांक ७१३ / पैकी जमिन उक्त विकास योजना रस्त्यासाठी संपादन करून रस्त्याचा उद्देश सफल होत नाही. करीता जालना रोड पासून म्हणजेच सर्व्हे क्रमांक ७०८,७०९ व ७१३ मधील २४ मीटर रूंद रस्त्या खालील क्षेत्र संपादन केल्यास रस्त्याचा विकास होवून रस्त्याचा काही अंशी उद्देश सफल होऊ शकेल. करीता मिळकत धारकाचे सर्व्हे क्रमांक ७१३/ पैकी सह इतर सर्व्हे क्रमांक ७०८ व ७०९ मधील रस्त्याचे भूसंपादन करणे उचित होईल. वरील सर्व्हे क्रमांकातून अंदाजे १५,४४० चौ.मी.संपादन होईल त्यासाठी मोबदला अंदाजे रूपये १ कोटी खर्च अपेक्षित आहे. करीता प्रस्ताव भूसंपादन खर्चासह मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नूसार २४ मीटर रूंद रस्ता सर्व्हे क्रमांक ७१३/ पैकी सर्व्हे क्रमांक ७०८ व ७०९ मधील बाधीत क्षेत्र अंदाजे १५,४४० चौ.मी.संपादन करणेस व भूसंपादन करण्यास लागणाऱ्या खर्चास बहूमताने मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३५/१२ :

उप आयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील चिकलठाणा व रेल्वेस्टेशन येथील औद्योगिक वस[illegible]त अनेक लघुउद्योग म[illegible] उद्योगांसाठी पुरक उद्योग म्हणून अवलंबून आहेत. परतू मनपा हद्दीतील जकात करामूळे हे उद्योग मनपा हद्दीबाहेरील त्याच प्रकारच्या उद्योग घटका बरोबरच्या स्पर्धेत टिकाव धरू शकत नाही. त्यापैकी अनेक उद्योग हे जॉब वर्क करणाऱ्या पध्दतीचे असून प्रक्रीया करण्यासाठी माल निर्यात करून तोच माल प्रक्रीयेअंती आयात करतात.

या लघुउद्योगांच्या कामाचे स्वरूप पाहता व माल निर्यात करून प्रक्रीयेअंती तोच माल परत येत असल्याने त्यावर जकात कर आकारणी योग्य नाही. त्यातही जकात आकारणीचे स्वरूप प्रक्रीयेपुरतेच मर्यादित असणे जरूरीचे आहे. परंतू मालाच्या संपूर्ण किमंतीवर जकात कर आकारण्यात येत असल्यामूळे अनेक वेळा जकातीचे मुल्य हे प्रक्रीयेच्या मूल्याहून अधिक होते. महानगरपालिका हद्दीतील प्रक्रीया करणाऱ्या उद्योजकांना या अडचणीतून मुक्त करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या जकात नियमात तशी तरतूद नाही. त्यामूळे अनेक उद्योग हे अडचणीत आलेले असून बरेच उद्योग बंद पडलेले आहेत. व यामूळे बंद व आजारी उद्योगांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. वास्तविक या अडचणीमूळे उद्योजक काम करू शकत नसल्यामूळे औद्योगिक वसाहतीमधून मिळणाऱ्या जकात कर वसूलीवर दिवसेंदिवस परिणाम होत

आहे. मनपा हद्दीतील उद्योग व्यवस्थित चालले तरच ते प्रक्रीयेसाठी विविध माल तसेच यंत्रसामुग्री आयात करतील व त्या आयातीत मालावरील जकात कर अप्रत्यक्षपणे महानगरपालिकेस प्राप्त होईल.

औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम - १९८४ मधील नियम-१६ (अ) मध्ये जिल्हा उद्योग केंद्र औरंगाबाद यांनी मंजूर केलेली वैध अनुज्ञप्ती बाळगणाऱ्या व त्यांचेकडे नोंदणी केलेल्या फक्त लघु उद्योजकांनी महानगरपालिका हद्दीमध्ये फक्त प्रक्रीयेसाठी आयात केलेल्या मालावरील एकूण जकातीच्या रक्कमेचा ९०% परतावा तो माल निर्यात करतेवेळी देण्याची तरतूद आहे.

करीता जकात नियम-१६ (अ) मध्ये **'' नियम-१६ (ब)''** म्हणून नव्याने निर्माण करून त्यामध्ये मनपा हद्दीतील प्रक्रीया करणाऱ्या पंजीकृत उद्योजकांना मनपा हद्दीबाहेर माल प्रक्रीया करण्यासाठी निर्यात करून प्रक्रिया झाल्यानंतर तोच माल परत आयात करण्यासाठी तरतूद करावी. सदरील तरतूदीमुळे मनपा हद्दीतील अनेक उद्योगांचे पुनरूज्जीवन होऊन मनपाच्या जकात उत्पन्नात वाढ होईल. त्यासाठी प्रक्रीया/ दुरूस्ती करीता माल निर्यात करून प्रक्रीया झाल्यानंतर आयात होणाऱ्या प्रक्रीया/दुरूस्तीसाठीच्या लेबर चार्जेस वर जकात दर अनुसूची ''ओ'' मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या दराने जकात आकारणी करण्यासाठी सोबत जोडलेल्या सुधारीत जकात नियम-१६ (अ) मध्ये **''नियम -१६ (ब)''** नव्याने समाविष्ठ करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

जकात नियम- १९८४ चे नियम क्र. (१६) अ मध्ये नियम -१६ (ब) नव्याने

समाविष्ठ करण्यासाठी दुरूस्तीचे प्रारूप

मध्यवर्ती कार्यालय : जकात विभाग

निर्यात अर्ज

उद्योजक, ज्याचे जिल्हा उद्योग केंद्र औरंगाबाद येथे प्रक्रीया/दुरूस्ती साठी परवाना (पंजीकृत) असलेले यांना प्रक्रीया करण्यसाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्दीबाहेर माल निर्यात करून त्यावर प्रक्रीयेनंतर तोच माल आयात करण्यासाठी करावयाचा अर्ज.

नाक्याचे नांव ----------

१. अर्जदाराचे नांव संपूर्ण पत्ता ----------
---

२. मालाचे वर्णन,नाव व प्रकार ----------
वजन व किमंत ----------
चलन/देयक क्रमांक---------- दि.----------

३. माल ज्या कारणासाठी हद्दीबाहेर पाठविण्याचे ३७ ाचे कारण------- इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५
---

४. माल पाठविण्याचे ठिकाण (संपूर्ण पत्ता) ----------
---

५. माल औरंगाबाद महानगरपालिका हद्दीबाहेर नेण्यात येईल व आणण्यात येईल त्या तारखा
निर्यात दिनांक ---------- आयात दिनांक ----------

६. माल ज्या स्वरूपात आणण्यात येईल त्याचे वर्णन ----------

७. वाहतुकदाराचे नांव ---------- वाहन क्रमांक ----------

८. एक्साईज/विक्रीकर चलन किंवा गेटपास क्रमांक ---------- दि.----------
मालाचे वर्णन ---------- किमंत ----------

उपरोक्त वर्णन केलेला माल मी वर नमूद केलेल्या कारणासाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्दीबाहेर घेऊन जात आहे. या मालाशिवाय मी त्याबरोबर दुसरा माल विना जकात घेऊन येणार नाही. तसेच दुरूस्ती

किंवा प्रक्रीया या कारणासाठी कच्चा माल निर्यात करून त्यापासून उत्पादन किंवा जूळणी करून नविन वस्तु तयार करणार नाही. उत्पादन व जुळणी मूळे नविन वस्तु तयार करून आणल्यास त्याची नियमाप्रमाणे संपूर्ण जकात भरणा करेल. तसेच दुरूस्ती/प्रक्रीयेकामी होणारे लेबर चार्जेस /सुटे भाग/ घटक भाग इत्यादी तद्अनुषंगिक खर्चावर नियमाप्रमाणे जकात कर भरणा करेल. यासंदर्भात अस्तित्वात असलेल्या अटी व शर्तीचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास मी नियमानूसार दंडास पात्र राहील.

दिनांक / / अर्जदाराची सही व शिक्का

कार्यालयीन उपयोगासाठी फक्त

निर्यात पास

अर्जदार यांनी वरील अर्जामध्ये नमूद केलेला माल औरंगाबाद महानगरपालिका हद्दीबाहेर घेऊन जाण्यासाठी ही परवानगी मिळाल्यापासून ९० दिवसाचे आत परत आणल्यास त्यावर संपूर्ण जकात कर न आकारता फक्त प्रक्रीया किंवा दुरूस्तीसाठी होणाऱ्या लेबर चार्जेसवर जकात कर आकारणी करण्याचे अटीवर माल आयात करण्यास परवानगी देण्यात येत आहे. ही परवानगी दिलेल्या मुदतीत व अटीस अधीन राहून देण्यात येत आहे.

अर्जदार यांनी निर्यात अर्ज शुल्क रक्कम रू.१००/- पावती क्रमांक ----------

दिनांक / / अन्वये भरणा केलेली आहे.

दिनांक / /

जकात निरिक्षक

महानगरपालिका,औरंगाबाद

१. अर्जदाराने परवानगी देण्यात आलेल्या मुदतीत माल परत आणावा.अन्यथा सदर मालावर संपूर्ण जकात कर भरावा लागेल. याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही.

२. अर्जदारास माल महानगरपालिका हद्दीबाहेर घेवून जाताना निर्यात नाक्यावर दाखवून निर्यात नाका निरिक्षकाची /कारकुनाची सही घ्यावी लागेल. तसेच परत आणतांना तो प्रवेश नाका निरिक्षकास / कारकुनास दाखवून तो रद्द करून घ्यावा लागेल. मात्र हद्दीबाहेर घेऊन जातांना निर्यात नाकानिरिक्षकाची/ कारकुनाची सही घेतली नाही [illegible] धित माल जकात आ[illegible]

३८

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

३. महानगरपालिकेने स्थायी आदेशात नमूद केलेले नियम अर्जदारावर बंधनकारक राहतील.

४. महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या काळात केलेले नियम अर्जदारावर बंधनकारक राहतील.

५. प्रक्रीयासाठी किंवा दुरूस्तीकामी निर्यात करावयाचा माल महानगरपालिका ठरवेल त्याच नाक्यावरून निर्यात करावा लागेल. निर्यात व फेरआयातीच्या वेळी ज्या नाक्यावरून निर्यात झाला आहे त्याच नाक्यावरून आयात झाला पाहिजे.

६. दुरूस्ती किंवा प्रक्रिया खर्चावर लेबर चार्जेसवर/घटक भाग/ सुटे भाग प्रचलित दराने जकात कर भरावा लागेल.

७. दुरूस्ती किंवा प्रक्रीया कामी निर्यात पास नुसार माल मनपा हद्दीतून बाहेर पाठविला असेल व प्रक्रीयेमूळे नविन उत्पादन/वस्तु पुन्हा आयात होत असेल तर प्रचलित दराने जकात वसूल केली जाईल.

८. वरिल अटी व शर्तीचे उल्लघंन करणारा अर्जदार दंडास पात्र राहील. व त्यास त्यापूढे सदरची सुविधा लागू राहणार नाही व याबाबत अर्जदारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

वर नमुद केलेला माल दिनांक / / रोजी माझे समक्ष ----------

वाजता---------- जकात नाका येथून वाहन क्रमांक ----------
अन्वये मनपा हद्दीबाहेर गेला.

जकात नाका निरिक्षक/नाका कारकुन

कार्यालयीन उपयोगासाठी फक्त

आयात पास

वरील नमूद केलेला माल दिनांक / / रोजी माझे समक्ष------
--
वाजता ---------- या जकात नाक्यावरून वाहन क्रमांक ----------
- अन्वये महानगरपालिका हद्दीमध्ये आयात झाला. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

अ. क्र.	मालाचा तपशिल	निर्यात झालेले नग	आयात झालेले नग	दुरूस्ती/ प्रक्रीया बिल क्रमांक	प्रक्रीया/ दुरूस्ती खर्च	जकात दर	जकात	पावती क्रमांक	दिनांक	शेरा

नाका कारकुन
नांव ----------
-- सही ----------

जकात निरिक्षक
नांव ----------
सही ----------

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जकात नियम-१६ (अ) मध्ये ''नियम -१६ (ब)'' म्हणून नव्याने निर्माण करून त्यामध्ये महापालिका हद्दीतील प्रक्रीया करणाऱ्या पंजीकृत उद्योजकांना महापालिका हद्दीबाहेर माल प्रक्रीया करण्यासाठी निर्यात करून प्रक्रीया झाल्यानंतर तोच माल परत आयात करण्यासाठी तरतूद करावी. त्यासाठी प्रक्रीया/दुरूस्ती करीता माल निर्यात करून प्रक्रीया झाल्यानंतर आयात होणाऱ्या प्रक्रीया/ दुरूस्तीसाठीच्या लेबर चार्जेस वर जकात दर अनुसूची ''ओ '' मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या दराने जकात आकारणी करण्यासाठी प्रस्तावा सोबत जोडलेल्या सुधारीत जकात नियम-१६ (अ) मध्ये '' नियम -१६ (ब) '' नव्याने समाविष्ठ करण्यासाठी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निर्यात अर्ज, निर्यात पास व आयात पास यामधील अटी व शर्तीच्या अधीन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३६/१३ :

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक २४.०४.२००२ मध्ये विषय क्रमांक ६०५ अन्वये नारेगांव, ब्रिजवाडी,मसनतपूर येथील कृषी क्षेत्रातील जमिनी निवासी क्षेत्रात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदरील निर्णयाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही प्रशासनातर्फे करतांना तांत्रिक मुद्दयावर उपसंचालक,नगर रचना औरंगाबाद यांचे मार्गदर्शन दिनांक १८.१२.२००४ च्या पत्रान्वये मागविले आहे. सदरील भागातील कृषी वापरातील क्षेत्र मोठ्या स्वरूपाचे असल्याने या भागातील विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करून शासनाने निर्धारीत केलेल्या नियोजन प्रमाणका प्रमाणे सेवा व सुविधांची आरक्षणे व विकास योजना रस्ते प्रस्तावित करणे आवश्यक आहे. आवश्यकता भासल्यास या कामी विकास योजना विशेष घटकाची स्थापना करावी लागेल व विद्यमान जमिन वापराबाबत नकाशा तयार करतांना परिसरातील भौगोलिक स्थिती बाबत कंटूर (Contour) सह टोटल स्टेशन सर्व्हे (Total Station Survey) करण्याची आवश्यकता आहे या कामी अंदाजे ५ ते १० लाख रूपयां पर्यंतचा खर्च होणे अपेक्षित आहे. खर्चासह सर्व्हेक्षणाच्या कामासाठी मान्यता व्हावी.

प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे, नारेगाव,ब्रिजवाडी, मसनतपूर येथील कृषि क्षेत्रातील जमिनी निवास क्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी शासनाने निर्धरीत केलेला नियोजन प्रमाणका प्रमाणे सेवा व सुविधांची आरक्षणे व विकास योजना रस्ते प्रस्तावित करणे आवश्यक असल्याने या कामी विकास योजना विशेष घटकांची स्थापना करणे व विदयामान जमिन वापराबाबत नकाशा तयार करण्यासाठी परिसरातील भौगोलिकस्थिती बाबत कंटूर (Contour) सह टोटल स्टेशन सर्व्हे (Total Station Survey) करण्यास व यासाठी प्रास्तावित अपेक्षित खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३७/१४ :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पुष्पनगरी स्मशानभूमीचे सुशोभिकरण देखभाल व परीरक्षण इत्यादी सेवा पुरविण्याची संधी पाच (५) वर्ष मिळण्याबाबत रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद (पुर्व) यांनी या विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला असून सदर प्रस्ताव हा सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावाचा सर्व खर्च रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद (पुर्व) हे करणार आहेत.

सदरील पुष्पनगरी स्मशानभूमीमध्ये महानगरपालिकेतर्फे सन २००४-२००५ या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रूपये ५.०० लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली असून सदर तरतूदीतून या विभागातर्फे स्मशानभूमीतील विविध कामे करण्याच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मंजूरी घेण्यात आलेली असून कामाची निविदा कार्यवाही चालू असल्याने निविदा कार्यवाही नंतर सदर अंदाजपत्रकीय काम हाती घेण्यात येणार आहे. मनपातर्फे मंजूर झालेल्या प्रस्तावा अंतर्गत व रोटरी क्लब तर्फे प्रस्तावित खालीलप्रमाणे आहे.

मनपातर्फे मंजूर झालेल्या प्रस्तावाअंतर्गत करण्यात येणारी कामे	रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद (पुर्व) संघटनेतर्फे प्रस्तावित कामे
१. सदर स्मशानभूमीच्या मुख्य गेटपासून बर्निंग शेडपर्यंत पाथवे तयार करणे. २. नागरीकांना बसण्यासाठी रेस्टींग शेड तयार करणे ३. झाडे लावण्यासाठी कर्बिंग करणे व बैठक व्यवस्थेसाठी बेंचेस बसविणे. ४. दशक्रिया विधीसाठी अस्तित्वात असलेल्या ओट्यावर पॉलीश फरशी बसविणे.	१. अस्थी सुरक्षित ठेवण्यासाठी १५ ते २० लॉकरची व्यवस्था करणे. २. श्रध्दाजंली सभा व भाव भक्ती गीते साठी ध्वनी प्रक्षेपण व्यवस्था करणे. ३. वृक्ष व हिरवळ लागवडीची व्यवस्था करणे (पाच वर्षापर्यंत देखभाल,परीरक्षण व आवश्यकतेनूसार पुर्नलागवण (औषधी,खत,साहित्य,मजुरीसह)

५. स्नानासाठी पाण्याची टाकी व शॉवर बसविणे. ६. मुख्य गेटवर स्मशानभूमीच्या नामफलकाची लोखंडी कमान बसविणे.	४. रंगकाम करणे व उपलब्ध पृष्ठभागावर सुविचार व संताची वचने उचित भिंतीचित्रे रंगविणे. **टप्पा क्र. २** १) मनपाने ठरवून दिलेल्या जागेवर देवदुताचा पूतळा उभारणे.

उपरोक्त रोटरी क्लब तर्फे प्रस्तावित कामे करून देण्यासाठी मनपास रोटरी क्लब औरंगाबाद यांच्याशी करारनामा करावा लागेल असे रोटरी क्लब यांनी सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केलेले असून करारनाम्यात खालील बाबींचा समावेश करण्याबाबत कळविले आहे.

१. रोटरी क्लब यांचा सहभाग केवळ बागकाम व मोकळ्या जागेतील साफसफाई इतकाच मर्यादीत असेल स्मशानभूमीतील दहन व्यवस्था, परवाना तपासणी,नोंदी इत्यादी कामे मनपा कर्मचाऱ्यांनी करावी.

२. विद्युत व पाणी पुरवठ्याची साधन सामुग्रीची देखभाल मनपाने करावी.

३. लागवड केलेले बागबगीचा व हिरवळ यांना आवश्यक पाणी पुरवठा उपलब्ध करून देणे व रोजचे पाणी देण्याची व्यवस्था मनपाने करावी.

४. करारनाम्याचा कालावधी पाच (५) वर्षाचा असावा.

५. रोटरी क्लब तर्फे पुरविण्यात आलेली ध्वनी प्रक्षेपण यंत्रणा, साहीत्य सामुग्री यांचे संरक्षण वापर व देखभाल मनपा कर्मचाऱ्यांनी करावी.

६. विकसित क्षेत्रात रोटरीचे बोधचिन्ह,क्लबचे नांव विकासासाठी आर्थिक मदत केलेले व्यक्ती/संस्था यांची कृतज्ञता म्हणून एक फलक लावण्याची मुभा द्यावी.

या संदर्भात मनपाच्या विधी सल्लागार विभागाचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांनी करारनाम्यात खालील अटी व शर्तींचा समावेश करण्याबाबत सुचविण्यात आलेले आहे.

१. स्मशानभूमीच्या जागेची व रोटरी संस्थेने उपलब्ध करून दिलेली सर्व साहित्याची मालकी नेहमीकरीता मनापाची राहील व त्यासाठी महानगरपालिकेतर्फे कोणतेही पेमेंट/खर्च करण्यात येणार नाही.

२. वृक्ष व हिरवळीच्या जागी साधन सामुग्री आणणे, लागवड करणे, लागवड या साठी लागणारे औषधी, खत, कापणी चे साहित्य, मजुरी इत्यादी साठी मनपा कोणताही खर्च करणार नाही.

३. करारनाम्यात नमुद केलेल्या कालावधीनंतर मुदतवाढ देणे अथवा न देणे किंवा मुदतीपर्वीच करारनामा रद्द करणे याचे सर्व अधिकार म[illegible]त महानगरपालिका [illegible] व त्याचा निर्णय अंतिम राहील.

४. करारनाम्यात नमुद केलेल्या कालावधीत कामा संदर्भाने आवश्यक त्या सूचना मनपातर्फे करण्यात आल्यास त्या सूचनांचे पालन करण्याची जवाबदारी रोटरीची राहील.

५. करारनाम्यात नमुद केलेल्या व्यतिरिक्त इतर कोणतेही काम रोटरी क्लब मनपाच्या पुर्व परवानगी शिवाय करणार नाही.

६. अस्थी सुरक्षित राखण्यासाठी रोटरी तर्फे ठेवण्यात येणाऱ्या लॉकरची व्यवस्था क्लब तर्फे करण्यात येत असली तरी अस्थि रक्ष व रेकॉर्ड मनपातर्फे ठेवण्यात येईल.

७. स्मशानभूमीतील परवाना/मृत्युची नोंद ठेवणे याबाबी मध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार क्लबला राहणार नाही.

८. स्मशानभूमीच्या जागेचा ताबा/ मालकी व नियंत्रण मनपाचे राहिल त्याबाबत रोटरी क्लबला त्यांचे नाव सिटीसर्व्हे मध्ये किंवा ट्रस्ट प्रापर्टी म्हणून नोंद घेता येणार नाही.

९. स्मशानभूमीत क्लबला कोणतीही फी आकारण्याचा /वसूल करण्याचा अधिकार राहणार नाही.

१०. करारनामा संबंधी किंवा याबाबत काही वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त मनपा यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

स्मशानभूमी साठी जागा ठेवणे व त्याचे नियमन करणे हे मु.प्रा.महा.अधि.१९४९ चे कलम ६३ (११) अन्वये महानगरपालिकेचे आवश्यक कर्तव्ये असल्याचे व रोटरी क्लबतर्फे प्रस्तावित प्रस्ताव हा सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून सादर करण्यात आलेला असल्याने रोटरी क्लब या सेवाभावी संस्थेस विकसित करणेसाठी व पाच (५) वर्ष देखभालीसाठी देणे यासाठी धोरणात्मक निर्णय ठरविण्यासाठी सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अट क्र.१ ते १० यास अधिन राहून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (११) अन्वये महानगरपालिकेचे आवश्यक कर्तव्ये असल्याचे व रोटरी क्लबतर्फे प्रस्तावित प्रस्ताव हा सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून सादर करण्यात आलेला असल्याने रोटरी क्लब या सेवाभावी संस्थेस विकसित करणेसाठी व पाच (५) वर्ष देखभालीसाठी देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३८/१५ :

अति.शहर अभियंता,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पैठण रोड (कांचननगर) ते हिंदुस्तान आवास सोसायटी पर्यंत रस्त्याचे बांधकाम व खडीकरण सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत झालेले आहे. सदर रस्ता महानगरपालिकेच्या हद्दीत असल्याने महानगरपालिकेतर्फे डांबरीकरणाचा प्रस्ताव तयार केलेला आहे. यास सार्वजनिक बांधकाम विभागाची एन.ओ.सी. आहे. सदर रस्त्याच्या डांबरीकरणाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ७,३०,०००/- चे तयार केले आहे.

सदर रस्त्याचे डांबरीकरण महानगरपालिकेतर्फे करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर मंजूरीसाठी तथा विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठण रोड (कांचननगर) ते हिंदुस्तान आवास सोसायटी पर्यंत रस्त्याचे बांधकाम व खडीकरण करणेच्या रक्कम रूपये ७,३०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५३९/१६-अ :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अर्थसंकल्प सन २००४-२००५ मधिल तरतूदीनुसार प्र.क्र.२८ कांचनवाडी येथील महानुभव पंथीय स्मशानभूमी विकसित करणेसाठीचे रक्कम रूपये ४,९९,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने स.संचालक,नगर रचना विभागाचा अभिप्राय मागविण्यात आला असता अभिप्रायानूसार सदरील जमिन ही विकास योजनेनूसार जरी Public utilities Zone असली तरी ती जमिन L.A. For Auranbgabad drainage Scheme च्या कारणासाठी आहे त्यामूळे सदर जमिनी पैकी उक्त कारणासाठी (कब्रस्तान व स्मशानभूमी) आवश्यक असल्यास सदर जागा ड्रेनेज स्कीम साठी आवश्यक आहे किंवा नाही याबाबत कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) यांचे स्वय:स्पष्ट अभिप्राय घेवून प्रकरण मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवून निर्णय घेणे योग्य राहील असे मत दिले.

त्यानूसार कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) यांनी अभिप्राय दिला कि, सदरील जागेत आज तेथे तीन/चार कबरी आहेत जेथे कबरी आहेत तेवढी जागा आज Lagoon च्या बाहेर आहे त्यास अनुसरून अस्तित्वातील कबरीच्या/महानुभव पंथीय स्मशानभूमीच्या अनुषंगाने त्या पर्यंत योग्य ती कार्यवाही करण्यास हरकत नाही.

करीता महानगरपालिका अर्थसंकल्प सन २००४-२००५ मधिल तरतूदीनुसार प्र.क्र.२८ कांचनवाडी येथील महानुभव पंथीय स्मशानभूमी व मुस्लीम कब्रस्तान विकसित करण्याबाबतचे प्रस्ताव मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक १०.१२.२००४ रोजी आदेशित केल्याप्रमाणे मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,व कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) यांनी दिलेल्या अभिप्रायाप्रमाणे महानगरपालिका अर्थसंकल्प सन २००४-२००५ मधिल तरतूदीनुसार प्र.क्र.२८ कांचनवाडी येथील महानुभव पंथीय स्मशानभूमी व मुस्लीम कब्रस्तान विकसित करणेस अंदाजपत्रकीय र.रू.४,९९,५००/- साठी सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५४०/१८ :

राज्य निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.हैद्राबाद या भारत सरकारच्या अंगीकृत व्यवसायाच्या सहकार्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र विकसित केले आहे.या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये आवश्यकतेनूसार उमेदवार निवडण्याची सोय आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र खरेदी करण्यावरील सुरूवातीस खर्चजास्त वाटत असला तरी २ निवडणूकांमध्ये संपूर्ण खर्चाची वसूली होऊ शकते. प्रत्येक महानगरपालिकांनी स्वत: मतदान यंत्रे घेतल्यास सर्वच महानगरपालिकांना फार जास्त खर्च येईल आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात वेगळी काढता येण्यासारखी मेमरी असल्यामूळे मतदान यंत्रे निवडणूक आटोपल्यानंतर इतरत्र हलवून वापरता येतील. या कारणामूळे साधारणपणे ३५ ते ४० टक्के खर्च महानगरपालिकांना कमी करावा लागेल.

निवडणूक प्रक्रिया अधिक गतिमान व्हावी, निकालावरील वेळ वाचावा व खर्चही वाचावा यासाठी इलेक्टॉनिक मतदान यंत्राचा वापर निवडणूकीत करणे गरजेचे असल्याचे मा.राज्य निवडणूक आयोगाने त्यांचे आदेश क्रमांक - रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५, दिनांक ५ जानेवारी २००५ अन्वये कळविलेले आहे.

मतदान यंत्रे घेतांना प्रत्येक महानगरपालिकांवर जास्त बोजा पडू नये, अशी राज्य निवडणूक आयोगाची इच्छा असून त्यामूळे प्रत्येक महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रातील मतदारांची संख्या विचारात घेऊन रूपये ५/- प्रति मतदार याप्रमाणे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी अंशदान द्यावयाचे आहे. प्रति मतदार रूपये ५/- याप्रमाणे प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी येणारी रक्कम धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्ट) असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन,मुंबई यांच्या नांवाने पाठविण्यात यावी असे कळविलेले आहे.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विधानसभा निवडणूकीच्या वेळची मतदार संख्या ५ लक्ष ७८ हजार ८२९ इतकी होती ती विचारात घेता महापालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या वेळी त्यात ५% वाढ गृहीत धरल्यास एकूण मतदार संख्या सुमारे ६ लक्ष २० हजार अपेक्षित आहे. प्रति मतदार रूपये ५/- प्रमाणे एकूण अंशदानाची रक्कम रू.३१,००,०००/- (अ[illegible] ये एकतीस लक्ष) इ[illegible] करीता आगामी मनपा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याकरीता अंशदानाची रक्कम रूपये ३१,००,०००/- धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्ट) असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन,मुंबई यांच्या नांवे पाठविण्याच्या मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

४३

इति.स.सा.सभा दि.१९.०१.०५

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आगामी मनपा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करण्याकरीता अंशदानाची रक्कम रूपये ३१,००,०००/- धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्ट) असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन,मुंबई यांच्या नांवे पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५४१/१७ :

सहाय्यक संचालक नगर रचना,प्रस्ताव सादर करतात की, मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८.१०.२००२ मधील विषय क्रमांक ७१७/१२ नूसार मा.शहर अभियंता यांनी सादर केलेल्या प्रस्तावा नूसार न.भू.क्र.१३९१४ व १३९१५ च्या आणि प्रस्तावित प्राथमिक शाळेच्या उत्तरेतून अस्तित्वातील ६.०० मीटर रूंद रस्ता हा ८८ मीटर इतक्या लांबीमध्ये १२ मीटर करणे आणि मंजूर शहर विकास आराखड्यातील प्रस्तावित १२.०० मीटर रूंद रस्ता हा १०२ मीटर इतक्या लांबी मध्ये रद्द करून रस्त्याच्या आखणीत बदल झाल्यामूळे आणि १२.०० मीटर रूंद रस्त्याची आखणी काही हद्दी पर्यंत रद्द केल्यामूळे प्रस्तावित आखणी नंतरचा भाग रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणे साठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्याच्या कार्यवाहीस मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती.

उक्त मान्यतेनूसार प्रशासनाने नियोजीत फेरबदला संदर्भाने आवश्यक ती सर्व कार्यवाही, म्हणजे वर्तमान पत्रात व शासकीय राजपत्रात नियोजीत फेरबदला संदर्भात प्रसिध्दी देऊन हरकती व सूचना मागविल्या. हरकत व सूचना सादर करणाऱ्या व्यक्तिंना सुनावणीची संधी देऊन सुनावणीवर निर्णय घेऊन प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला.

उक्त नमुद फेरबदला नूसार नियोजीत १२.०० मीटर रूंदीचा रस्ता हा आरक्षण क्रमांक ७७ दुकान केंद्र व वाहनतळ ह्या आरक्षित क्षेत्रातून नियोजीत आहे. सदर आरक्षणा अंतर्गत क्षेत्राचे महानगरपालिकेने भूसंपादन करून भागश: विकास देखिल केला आहे. त्यामूळे नियोजीत १२.०० मीटर रूंद रस्त्यासाठी महानगरपालिकेस भूसंपादनाचा खर्च ही लागणार नाही तर केवळ जागेवर असणारा ६.०० मीटर रूंद रस्ता हा १२.०० मी. रूंदीसाठी विकसीत करावा लागणार आहे.

ही बाब विचारात घेऊन उक्त ठरावास पूरक असा नगर भूमापन क्रमांक १३९१४, १३९१५ व १३९१६ च्या व प्रस्तावित प्राथमिक शाळेच्या उत्तरेतून जागेवरील ६.०० मीटर रूंद रस्ता हा भाग नकाशावर हिरव्या रंगाने दर्शविल्याप्रमाणे ८८ मीटर इतक्या लांबीमध्ये १२.०० मीटर करणे. म्हणजेच आरक्षण क्रमांक ७७ दुकान केंद्र व वाहनतळ ह्या क्षेत्रातून जागेवर असणारा ६.०० मीटर रूंदीचा रस्ता १२.०० मीटर रूंद करणे आणि १२.०० मीटर रूंद रस्त्याची आखणी काही हद्दी पर्यंत रद्द केल्यामूळे प्रस्तावित रस्त्याच्या आखणी नंतरचा आरक्षण क्रमांक ७७ दुकान केंद्र व वाहनतळ च्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यातील भाग व १२.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याचा रद्द केलेला भाग रहिवास विभागात समाविष्ट करणे व या प्रस्तावित फेरबदलामूळे आरक्षण क्रमांक ७७ दुकान केंद्र व वाहनतळ यांचे क्षेत्र अंदाजे ०.०९ हेक्टर ने कमी होवून आता ते ०.७२ हेक्टर ऐवजी ०.६३ हेक्टर शिल्लक राहत आहे. असा बदल करणे योग्य होईल.

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा दिनांक १८.१०.२००२ मधील विषय क्र.७१७/२ नूसार १२ मीटर रूंद रस्त्याची आखणी बदलणेस मंजूरी देण्यात आलेली आहे, याच संदर्भात आता प्रस्तावित केल्याप्रमाणे, उक्त ठरावास पूरक असा प्रस्तावानूसार नगर भूमापन क्रमांक १३९१४, १३९१५ व १३९१६ च्या व प्रस्तावित प्राथमिक शाळेच्या उत्तरेतून जागेवरील ६.०० मीटर रूंद रस्ता हा भाग नकाशावर हिरव्या रंगाने दर्शविल्याप्रमाणे ८८ मीटर इतक्या लांबीमध्ये १२.०० मीटर करणे. म्हणजेच आरक्षण क्रमांक ७७ दुकान केंद्र व वाहनतळ ह्या क्षेत्रातून जागेवर असणारा ६.०० मीटर रूंदीचा रस्ता १२.०० मीटर रूंद करणे आणि १२.०० मीटर रूंद रस्त्याची आखणी काही हद्दी पर्यंत रद्द केल्यामूळे प्रस्तावित रस्त्याच्या आखणी नंतरचा आरक्षण क्रमांक ७७ दुकान केंद्र व वाहनतळ च्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यातील भाग व १२.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याचा रद्द केलेला भाग रहिवास विभागात समाविष्ट करणे व या प्रस्तावित फेरबदलामूळे आरक्षण क्रमांक ७७ दुकान केंद्र व वाहनतळ यांचे क्षेत्र अंदाजे ०.०९ हेक्टर ने कमी होवून आता ते ०.७२ हेक्टर ऐवजी ०.६३ हेक्टर शिल्लक राहत आहे, असा बदल

करणे व ही कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५४२/१९ :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, क्रांतीचौक ते एस.एस.सी.बोर्ड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचा समावेश २.५० कोटी विशेष आर्थिक तरतुद अंतर्गत करण्यात आलेला आहे. करीता या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक विभागाचे जिल्हा दरसुची सन २००३-२००४ च्या नुसार रक्कम रू.२१,३२,९००/- (एकविस लक्ष बत्तीस हजार नऊशे रूपये फक्त) चे तयार करण्यात आलेले आहे. तरी सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये २१,३२,९००/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक ते एस.एस.सी.बोर्ड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या रक्कम रू.२१,३२,९००/- (एकविस लक्ष बत्तीस हजार नऊशे रूपये फक्त) चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.५४३/२० :

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक टि.पी.एस.-३००३/७०३/प्रक्र.३२४/ २००३/नवि-३० दिनांक २८ ऑक्टोबर २००४ नूसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ (१) अन्वये निदेश प्राप्त झाले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे,

ज्या अर्थी औरंगाबाद शहरांची मुळ हद्दीची सुधारीत विकास योजना (या पूढे '' **उक्त विकास योजना**'' असे उलेखिलेली) शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्रमांक टि.पी.एस.-३०९९/११०७/ प्रक्र.४७ (अ)/२०००/नवि-३० दिनांक १८ एप्रिल २००१ अन्वये भागश: मंजूर करण्यात आली असून ती दिनांक १ जून, २००१ पासून अंमलात आली आहे.

ज्या अर्थी उक्त विकास योजनेत मौजे गारखेडा येथील सर्व्हे क्रमांक ५५ वर (या पुढे '' **उक्त जागा** '' असे उल्लेखिलेली) आरक्षण क्रमांक २४७ '' **दुकान केंद्र** '' व ''**वाहनतळ**'' (भागश:), आरक्षण क्रमांक २४८ ''**क्रिडागंण**'' (भागश:), आरक्षण क्रमांक २४९ ''**प्राथमिक शाळा** '' तसेच १२.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता १५ मीटर रूंद विकास योजना रस्ता व २४.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित असून सर्व्हे क्रमांक ५५ मधील उर्वरीत जागा रहिवास व औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. (या पूढे ''**उक्त विकास योजना प्रस्ताव** '' असे उल्लेखिलेले.**)**

आणि ज्या अर्थी उक्त जागा औरंगाबाद विभागीय क्रिडा संकुलासाठी उपलब्ध करून देण्याचा महसुल व वन विभागाचा प्रस्ताव आहे. तथापी उक्त जागा उक्त विकास योजना प्रस्तावांनी बाधीत होते. यापैकी आरक्षण क्रमांक २४८ हे ''**क्रिडागंण**'' साठी प्रस्तावित असून प्रस्तुत प्रकरणी क्रिडांगणाच्या आरक्षणात बदल होत असला तरी तो क्रिडा संकुलासाठीच होत असल्याने शासनाच्या दिनांक २९ ऑगस्ट, २००३ च्या निदेशानूसार घ्याव्या लागणाऱ्या मंत्रिमंडळच्या विवक्षित मान्यतेची आवश्यकता नाही असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या बाबींचा विचार करता उक्त जागा उक्त विकास योजना प्रस्तावामधून वगळून ती क्रिडा संकुलासाठी आरक्षित करणेसाठी (या पूढे ''**उक्त फेरबदल** '' असे उल्लेखिलेला) फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वित करणे बाबत औरंगाबाद महानगरपालिकेस निदेश शासनाचे मत झाले आहे.

त्यानूसार शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेस उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये खालील प्रमाणे निदेश दिले आहेत.

निदेश :-

०१. उक्त विकास योजनेतील मौजे गारखेडा येथील सर्व्हे क्रमांक ५५ वरील आरक्षण क्रमांक २४७ **''दुकान केंद्र ''** व **''वाहनतळ''** (भागश:) आरक्षण क्रमांक २४८ **''क्रिडांगण''** (भागश:) आरक्षण क्रमांक २४९ **''प्राथमिक शाळा''** व १२.०० मीटर रूंद पूर्व पश्चिम विकास योजना रस्ता (भागश:) व १५.०० मीटर रूंद उत्तर-दक्षिण विकास योजना रस्ता तसेच सर्व्हे क्रमांक ५५ मधील उर्वरीत जागा रहिवास तसेच औद्योगिक विभागातून वगळून त्या खालील क्षेत्र क्रिडा व वाणिज्य वापरामध्ये समाविष्ट करण्यात यावे.

०२. आरक्षण क्रमांक २४७ मधील उर्वरीत क्षेत्र आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात यावे.

०३. आरक्षण क्रमांक २४८ क्रिडांगण खालील सर्व्हे क्रमांक ५५ बाहेरील क्षेत्र लगतच्या दक्षिणेकडील १५.०० मीटर रूंद रस्त्याच्या क्षेत्रासह आरक्षण क्रमांक २४९ **''प्राथमिक शाळा ''** म्हणून आरक्षित करण्यात यावे.

विकास योजनेमध्ये वरील प्रमाणे बदल करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने उक्त अधिनियमाच्या कलम -३७ च्या तरतूदींचे पालन करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करावा तसेच उक्त अधिनियमातील कलम ३७ (१) मधील तरतूदी नूसार ६०दिवसाच्या विहीत कालावधीत तशी फेरबदलाची सूचना विहीत मार्गाने प्रसिध्द करावी व तद्नंतर उक्त अधिनियमातील तरतूदीचे पालन करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करावा.

शासनाच्या सदर निदेशास शासन,नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्रमांक टि.पी.एस.-३००२/ १६४६/प्र.क्र.३७६/२००२/नवि-३० दिनांक २३.११.२००४ नूसार पुढील आदेश होई पर्यंत स्थगिती देण्यात आली होती. तथापी शासन नगर विकास विभाग यांचे कडील पत्र जा.क्र. टि.पी.एस.३००२/१६४६/प्रक्र.३७६/२००२/नवि-३० दिनांक ०६ डिसेबंर,२००४ अन्वये दिनांक २३.११.२००४ रोजीच्या पत्रान्वये दिलेली स्थगिती उठविण्यात आली आहे.

उक्त शासन निदेशा संदर्भाने पडताळणी अंति खालील त्रुटी आढळून येतात.

अ) उक्त निदेश क्रमांक (१) मध्ये सर्व्हे क्रमांक ५५ वरील आरक्षण क्रमांक २४७ **''दुकान केंद्र ''** व **''वाहनतळ''** (भागश:) नमूद आहे. वस्तुस्थिती नूसार आरक्षण क्रमांक २४७ मध्ये अंतर्भूत असणारे संपूर्ण क्षेत्र सर्व्हे क्रमांक ५५ मधील आहे. या बाबींचा विचार करता निदेश क्रमांक (२) नूसार आरक्षण क्रमांक २४७ मधील उर्वरित क्षेत्र (जे शिल्लकच नाही) ते रहिवास विभागात समाविष्ट करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

ब) उक्त निदेश क्रमांक (१) मध्ये केवळ १२.०० मीटर रूंद पुर्व-पश्चिम विकास योजना रस्ता व १५.०० मीटर रूंद उत्तर-दक्षिण विकास योजना रस्ता हे दोन विकास योजना रस्ते वगळण्याबाबत निदेश आहेत. तथापी उक्त निदेश क्रमांक (३) मध्ये आरक्षण क्रमांक २४८ **''क्रिडांगण''** खालील सर्व्हे क्रमांक ५५ बाहेरिल क्षेत्र लगत दक्षिणेकडील १५.०० मीटर रूंद रस्त्याच्या क्षेत्रासह आरक्षण क्रमांक २४९ **''प्राथमिक शाळा ''** म्हणून आरक्षित करण्यांत यावे असा उल्लेख आहे. परंतू निदेश क्रमांक (१) मध्ये आरक्षण क्रमांक २४८ **''क्रिडांगण ''** च्या दक्षिणेकडील १५.०० पुर्व-पश्चिम विकास योजना रस्ता वगळण्या बाबत उल्लेख नाही. त्यामूळे सर्व्हे क्रमांक ५५ बाहेरील क्षेत्र लगत दक्षिणेकडील १५.०० मीटर रूंद रस्त्याच्या क्षेत्रासह ह्या ऐवजी सर्व्हे क्रमांक ५५ बाहेरील क्षेत्र लगत उत्तरे कडील १२.०० मीटर रूंद (जो वगळण्या बाबत निदेश प्राप्त) रस्त्याच्या क्षेत्रासह आरक्षण क्रमांक २४९ **''प्राथमिक शाळा ''** म्हणून आरक्षित करणे संयूक्तीक होईल.

क) या प्रकरणी सभोवतालचे भागाचे समन्वयाचे तसेच नियोजनाचे दृष्टीकोनातून सर्व्हे नंबर ५४ मधील **काबरा नगर** ह्या मंजूर रेखांकन वसाहतीस पुरेशा रूंदीचा पोच रस्ता उपलब्ध होणे क्रमप्राप्त आहे. त्यानूसार आवश्यक नियोजन करणे गरजेचे ठरते. या संदर्भाने मा.शहर अभियंता व अतिरिक्त शहर अभियंता यांचेशी विचार विनिमय करण्यात आला आहे. त्यानूसार सर्व्हे क्रमांक ५५ च्या पूर्व हद्दी लगत नविन १५.०० मीटर रूंद उत्तर-दक्षिण विकास योजना रस्ता प्रस्तावित करणे व विद्यमान मंजूर विकास योजना आरक्षण क्रमांक २४९ ''प्राथमिक शाळा '' च्या उत्तरेस असणारा १५.०० मीटर रूंद पुर्व-पश्चिम विकास येाजना रस्ता न वगळता तो विद्यमान मंजूर विकास योजने नूसार कायम ठेवणे नियोजनात्मक दृष्ट्या अधिक योग्य राहील असे ठरले.

तरी प्राप्त शासन निदेश व उक्त नमूद अ), ब), क) नूसार नमुद बाबींचा विचार होऊन निर्णय होणे योग्य राहील.

प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

संवाद :

श्री.प्रल्हाद निमगांवकर : विषय क्र.२० मध्ये गारखेडा गांवा कडून येणारा रस्ता तसाच काबरानगर कडे वाढवावा अशी दुरूस्ती करावी.

मा.महापौर : पुरवणी विषय क्र.१ रद्द करून बाकी सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे. व विषय क्र.२० मध्ये दुरूस्ती मान्य केली जाते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,शासनाने दिलेल्या निदेशानूसार मौजे गारखेडा सर्व्हे क्रमांक ५५ वरील आरक्षण क्रमांक २४७ दुकान केंद्र व वाहनतळ भागश:, आरक्षण क्रमांक २४८ क्रिडांगण भागश: आरक्षण क्रमांक २४९ प्राथमिक शाळा व १२ मीटर रूंद पूर्व पश्चिम विकास योजना रस्ता (भागश:) व १५ मीटर रूंद उत्तर - दक्षिण विकास योजना रस्ता तसेच सर्व्हे क्रमांक ५५ मधील उर्वरीत जागा रहिवास तसेच औद्योगिक विभागातून वगळून त्या खालील क्षेत्र क्रिडा व वाणिज्य वापरामध्ये समाविष्ट करण्यास खालील दुरूस्त्यासह मान्यता देण्यात येते.

०१. सभोवतालच्या भागाचे समान्वयाचे तसेच नियोजनाच्या दृष्टीकोनातून सर्व्हे नंबर ५४ मधील काबरानगर ह्या मंजूर रेखांकनास पुरेशा रूंदीचा पोच रस्ता उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून सर्व्हे क्रमांक ५५ गारखेडा अंतर्गत १५.०० मीटर रूंद पुर्व- पश्चिम विकास योजना रस्ता न वगळता ता विद्यमान मंजूर विकास योजनेनूसार कायम ठेवावा व सुतगिरणी चौका पासून ते काबरा नगर रेखांकनातील १५.०० मीटर रूंद रस्त्या पर्यंत उत्तर दक्षिण नविन १५.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करावा.

०२. आरक्षण क्रमांक २४८ क्रिडांगण खालील सर्व्हे क्रमांक ५५ बाहेरील क्षेत्र लगतच्या १२.०० मीटर रूंद पुर्व - पश्चिम रस्त्याच्या क्षेत्रासह आरक्षण क्रमांक २४९ प्राथमिक शाळा म्हणून आरक्षित करण्यांत यावे, वैधानिक कार्यवाही व्हावी.

पुरवणी विषय

विषय क्र.५४४/१ :

मोतीकारंजा चौरस्त्याला सैफि संत ''कप्तानशा बाबा '' यांचे नांव देण्यात यावे. कारण कप्तानशहा बाबा हे सर्व धर्माच्या मानलेल्यापैकी एक संत होते. त्यांनी या भागात चांगल्याप्रकारे काम केले या भागात त्यांचे मोठा जनसमुदाय आहे.

दरवर्षा प्रमाणे त्यांच्या नावाने ऊरूस भरतो. तरी मेहरबान साहेबांनी याचा विचार करून या भागात वरील प्रमाणे नाव देण्यात यावे हि नम्र विनंती.

सुचक : श्री.किशोर तुलशीबागवाले अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली.

संवाद :

श्री.जगदीश सिध्द : पुरवणी विषय क्र.१ या ठिकाणी अगोदरच प्रस्ताव झालेला आहे. रद्द करण्यात यावा.

मा.महापौर : रद्द करण्यांत येतो.

ठराव :

सदरचा प्रस्ताव रद्द करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

विषय क्र. ५४५/२ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रियदर्शनी इंदिरानगर,गारखेडा येथे मुस्लीम समाजाची संख्या किमान ६०% (साठ टक्के) असून त्या भागात लहान मुलांना शिक्षण अवगत होण्यासाठी मराठी माध्यमाच्या दोन बालवाड्या चालतात. परंतू तेथे मुस्लीम समाज हा ६०% टक्के असून सुध्दा तेथे उर्दू विभागाची बालवाडी अस्तित्वात नाही. प्रियदर्शनी इंदिरानगर येथे मनपाने बांधलेले व मनपाच्या मालकीचे समाजमंदीर असून त्या समाजमंदिरात मनपाची उर्दू विभागाची बालवाड चालू करण्यास मा.सभागृहाने मान्यता द्यावी करीता प्रस्ताव सर्वानुमते मंजूरीस्तव सादर.

सुचक : १. सौ.रशिदा बेगम गफ्फार यारखॉन, २. श्री.सय्यद अली मिरा सलामी

अनुमोदक : श्री.नजर हमीद.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रियदर्शनी इंदिरानगर,गारखेडा येथे महापालिकेने बांधलेल्या समाजमंदीरात उर्दू विभागाची बालवाडी सुरू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५४६/४ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठण रोडवरील रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकामाने बाधीत झालेल्या सात व्यावसायिकांचे स्थलांतर करून त्यांना पर्यायी जागा महापालिकेने दिलेल्या आश्वासनानुसार रेल्वेस्टेशनजवळील मनपा विश्रामगृहाच्या संरक्षित भिंतीलगत देण्यात आलेली होती. परंतू सन २००१ मध्ये मा.न्यायालयाचे आदेशानुसार सदरील दुकाने अतिक्रमण विभागातर्फे काढण्यात आल्यामूळे या व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. पर्यायी जागा देण्याकरीता संबंधीतांनी अनेकवेळा मनपाकडे अर्ज विनंत्या केल्या परंतू अद्याप पर्यंत त्यांना जागा देण्यात आलेली नसल्याने त्यांचे कुटूंबाचे उदरनिर्वाहाकरीता काहीही साधन राहीलेले नाही. संबंधीत प्रभागातील नगरसेवकांनी देखील या व्यावसायिकांना पर्यायी जागा देण्याची मागणी केलेली आहे.

रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकामामूळे बाधीत झालेले व्यावसायिक सर्वश्री.जावेद अहमद खान हाजी महेमुद खान, नदीम अहमद खान महेमुद खान, चुवरदास जीवतराम जेठानी, शेख हबीब शेख नुर, अजिम खान वजीर खान, स.जलाल स.ताज महंमद,मीर अहमद अली मीर बाबर अली, या सात व्यावसायिकांना रेल्वेस्टेशनजवळील मनपा विश्रामगृहाच्या संरक्षित भिंतीच्या आतील बाजूस पर्यायी जागा व्यवसायाकरीता देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : १. श्री.विकास रतनलाल जैन, २. श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले, ३. श्री.किशोर तुलशीबागवाले

अनुमोदक:१श्री.मिर हिदायत अली,२.श्री.नासेर खा ो,३.श्री.खाजा श कोकाटे

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकामामूळे बाधीत झालेले प्रस्तुत प्रस्तावातील सात व्यावसायिकांना रेल्वेस्टेशनजवळील महापालिका विश्रामगृहाच्या संरक्षित भिंतीच्या आतील बाजूस पर्यायी जागा देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५४७/३ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुकूंदवाडी महानगरपालिका शाळेच्या मागे असलेली मनपाची खुली जागा सर्वे क्र.१ एक जीचे क्षेत्रफळ ३०×७० असे आहे, मुकूंदवाडी स्लम भागात व्यायाम शाळा नाही तसेच लग्न कार्यासाठी जागा नाही. करीता व्यायाम शाळा व लग्न कार्यासाठी वरील ही जागा देण्यात यावी व मनपा कडून या जागेवर दोन्ही कामासाठी निधी उपलब्ध करून विकसीत करण्यासाठी हा प्रस्ताव मी सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर केला आहे.

सुचक : श्री.मोतीलाल जगताप अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुकूंदवाडी महानगरपालिका शाळेच्या मागे असलेल्या मनपाच्या खुल्या जागेत व्यायाम शाळा बांधुन,मंगल कार्यासाठी विकसीत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५४८/५ :

प्रभाग क्र.२४ भागातील काल्डा कॉर्नरच्या अलीकडे मनपाचा सर्व्हे नंबर ४३ असून तो भाग पूर्ण विकसीत झाला आहे.

तेथील नागरीकांच्या इच्छेनूसार त्या भागास 'सुयश कॉलनी ' असे नांव देण्यात यावे, तरी ते मंजूर व्हावे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.सुवर्णा चंद्रात्रे अनुमोदक : १. सौ.विजया रहाटकर, २. डॉ.आशा बिनवडे

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२४ भागातील काल्डा कॉर्नरच्या अलीकडे असलेल्या मनपाचा सर्व्हे नंबर ४३ या भागास 'सुयश कॉलनी ' असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ५४९/६ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, फाजीलपुरा हा भाग जुन्या वसाहती पैकी असून ९०% ही वसाहत विकास योजनेच्या आर-१ भागात येते व उर्वरीत १०% आर-२ भागात दाखविण्यात आली आहे. ही वसाहत अत्यंत जुनी असून ह्या संपूर्ण वसाहतीचा विकास आर-१ प्रमाणे झालेला असून अत्यंत दाट वसाहत आहे. सदर वसाहत ही जुन्या तटभिंतीच्या आतील असून १९७५ च्या विकास योजना मंजूर होण्यापूर्वी हा भाग विकसीत झालेला आहे.

तरी आता खालील चतु:सिमाचे आतील भाग मंजूर विकास योजने मध्ये आर-२ ऐवजी आर-१ मध्ये समाविष्ठ करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदल करण्याची कार्यवाही मान्यता देणे योग्य वाटते.

चतु:सिमा

पुर्वेस : दर्गा हजरत पिरगैब साहाब

पश्चिम : खोजे समाजाचे जमातखाना

दक्षिण : विद्यमान नाला

उत्तर : तटभिंत व तद्नंतर मोहनलाल नगर

तरी वरील प्रमाणे वसाहत, वरील प्रमाणे ा वसाहत आर-१ म महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचनाचे १९६६ चे कलम ३७ कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार जसे अधिसूचना काढणे, सूचना व हरकती मागविणे, सुनावणी करणे व अंतीम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेस प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.मो.जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली

ठराव :

